# श्री साईलीला



ानेवारी १९७९ ] श्रीसाई समकालीन संत विशेषांक [ किमत ६० पैसे

फोन : ३५४३३७

श्रीसाईबाबा ट्युटोरिअल ॲकॅडमीज्

इंटर आर्टस् क्लासेस ( १९४३ )

## स्पेशल इंटर आर्टस्चे एकमेव क्लासेस

**क्षत्रिय निवास, गिरगांव पोर्तुगीज चर्च, लाखाणी बुकडेपो समोर**

— वैशिष्ट्य —

**आमचे यश :—** प्रत्येक वर्षी २०–२५ विद्यार्थी लॉजिक व इकॉनॉमिक्समध्ये फर्स्ट क्लास मार्क्स मिळवतात. १९७५ साली आमची विद्यार्थिनी कुमारी गोरांडे पारेख मुंबई विश्वविद्यालयाच्या इंटर आर्टस् परीक्षेत पहिली आली व तिने रु. १२००/– ची लोटस स्कॉलरशीप व रु. १२००/– ची गंगाबाई भट ह्या दोन स्कॉलरशीप्स मिळविल्या.

**आमचे माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी :—** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री नामदार श्री. शंकरराव चव्हाण, चीफ जस्टीस ऑफ इंडिया नामदार श्री. वाय्. व्ही. चंद्रचूड, भवन्स हजारीमल सोमाणी कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. शशिकांत पारेख, अंबिका सिल्क मिल्सचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सुरेंद्र मेहता, कामानी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. नवीन कामानी इत्यादींची मुले मुली.

**ज्युनिअरच्या परीक्षेअगोदर ए. टी. के. टी. सोडविलीच पाहिजे. म्हणून आता नापास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी खास नवीन बॅचेस लवकरच सुरू होत आहेत.**

ॲडमिशन्स जोरात सुरू आहेत.

त्वरा करा! मर्यादित जागा!!

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

देहधारी म्हणूनि जित ।
समाधिस्थ जे ते काय मृत ।
साई जनन मरणातीत ।
सदा अनुस्यूत स्थिरचरीं ॥१२०॥

वन्ही जैसा काष्ठी गुप्त ।
दिसेना परी तदंतर्हित ।
घर्षण प्रयोगें होई प्रदीप्त ।
तैसाच भक्तार्थ हा साई ॥१२१॥

एकदा जो प्रेमें देखिला ।
तयाचा आजन्म अंकित झाला ।
केवळ अनन्य प्रेमाचा भुकेला ।
तयाच्या हाकेला ओ देई ॥१२२॥

न लगे तयासी स्थळ वा काळ ।
उभा निरंतर सर्व काळ ।
कैसी कोठून दावील कळा ।
करणी अकळ तयाची ॥१२३॥

ऐसी काही करील रचना ।
मनात येतील कुतर्क नाना ।
तों तों दृष्टी ठेवितां चरणां ।
ध्यान धारणा वाढेल ॥१२४॥

—श्रीसाईसच्चरित् अध्याय ३२ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५७ वे ] जानेवारी १९७९ [ अं. १०

: संपादक :

श्री. क. ही. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# श्रीसाईलीला

## लेखक-कवींचे पंचम स्नेहसंमेलन-शिरडी-१९७९

* "श्रीसाईलीला" लेखक-कवींचे पंचम स्नेहसंमेलन शिरडी क्षेत्री येत्या **रविवार ता. २८ व सोमवार ता. २९ जानेवारी १९७९** रोजी साजरे करण्यात येत आहे. या पंचम स्नेहसंमेलनात फक्त श्रीसाईलीलेच्या लेखक-कवींनाच सहभागी होता येईल. संमेलनास येणाऱ्या लेखक-कवींना फक्त आपल्याबरोबर आपल्या सौभाग्यवती व मुलांनाच आणता येईल. लेखक-कवी व त्यांच्या कुटुंबियांच्या निवास-भोजनाची, चहापानाची सारी व्यवस्था श्रीसाई-बाबा संस्थान शिरडीतर्फे करण्यात येईल. तरी या संमेलनास हजर राहू इच्छिणाऱ्या लेखक-कवींनी मे. कोर्टरिसिव्हरसाहेब, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, जि. अहमदनगर, ता. कोपरगाव यांचेकडे त्वरीत पत्रव्यवहार करून आपल्या आगमनाची सूचना त्यांना द्यावी व आपणाबरोबर किती कुटुंबीय येत आहेत ते कळवावे. त्याचप्रमाणे हीच माहिती कार्यकारी संपादक श्रीसाईलीला, 'साईनिकेतन' डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ यांना या पत्त्यावर ता. २० जानेवारी १९७९ पर्यंत पोचेल या बेताने पाठवावी. या तारखेनंतर मात्र संमेलनाचे बाबतीत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. दोन्हीकडे पाठविल्या जाणाऱ्या पत्रांवर "श्रीसाईलीला ५ वे संमेलन" असा उल्लेख करावा व २७ जानेवारीपूर्वी शिरडीस येऊ नये.

संमेलनाचे अध्यक्ष-साईसच्चरितकारांचे चिरंजीव

**डॉ. गजाननराव दाभोलकर**

मुख्य अतिथी—महामना **प. पू. श्रीराधाकृष्णस्वामीजी**

अध्यक्ष, अखिल भारतीय श्रीसाईसमाज, मद्रास

कार्यवाह

**डॉ. श्री. दि. परचुरे**

**श्री. सदानंद चेंदवणकर**

का. संपादक श्रीसाईलीला

संमेलन निमंत्रक

**श्री. क. ही. काकरे**

न्यायालयधारक

श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

## संपादकीय –

स. न. वि. वि.

# जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती

महाराष्ट्र म्हणजे संतांचा देश. संतांच्यामुळे महाराष्ट्र पावन झाला. संतांची शिकवण महाराष्ट्रात घराघरातून आपल्याला पहावयास मिळते. सदाचार-संतसंग-नामस्मरण या संतांच्या शिकवणीमुळे महाराष्ट्र पावन झाला आहे. प्रत्येक महाराष्ट्रीय भक्ताला आपण या भूमीत जन्माला आल्यामुळे धन्य वाटल्याशिवाय रहात नाही. "सत् जानाती सः– संतः" अशी संत शब्दाची व्युत्पत्ती लावली जाते. संत म्हणजे सत् कार्य करणारा, सन्मार्गाला जाणारा, सत्य जाणणारा, सत् आणि असत् यांचे परिपूर्ण ज्ञान असणारा. 'सत्यम् शिवम् सुंदरम्' म्हणजेच संत. संत म्हणजे अनुभवाचा सागर. आधी केले मग सांगितले, दुःखातून खऱ्या सुखाकडे नेणारा, मार्गदर्शन करणारा खराखुरा परमेश्वराचा प्रतिनिधीच.

परमेश्वर निराकार निर्गुण आहे. तो दिसणे शक्य नाही. पण त्याने मानवाकरिता आकार घेतला. संतांनी सुखदुःखाचा वेध घेऊन मानवाला शांतीमार्ग आपल्या अनुभवाने आपल्या बुद्धीचातुर्याने सोदाहरण पटवून दिला.

संतांचे ज्ञान हे पुस्तकी ज्ञान नाही. पुस्तकाचा अभ्यास करून पदव्या मिळविता येतील. ते ज्ञान जीवनाच्या रहाटगाडग्यात उपयोगी पडेल पण संतांचे अनुभवाचे ज्ञान बोध हे खास प्राचीन कालापासून उपयोगी पडले आहे आणि पडत आहे आणि पडणार आहे.

संत म्हणजे पवित्र गंगा. गंगा कधीही मी गंगा आहे, मजकडे या आणि पावन व्हा असे म्हणत नाही. त्याचप्रमाणे संत. गंगा कुणालाही ना म्हणत नाही. कुणीही यावे. तिचे पवित्र जल प्राशन करावे ते गढूळ करण्याचा यत्न केला तर ते गढूळ होत नाही. तसेच संतांचे. कुणीही यावे, कुणी निंदावे, कुणी वंदावे. त्यांना त्यांची काळजी तमा नसते. त्यांचे जनजागृतीचे काम आपले सतत चालू असते. आलात तर ज्ञानामृत प्यायला मिळेल, ऐहिक सुखाच्या भ्रामक कल्पना नष्ट होऊन खऱ्या सुखाचा मार्ग कळेल. आत्म्याकडून परमात्म्याकडे जाण्याचा मार्ग मोकळा होऊन मनुष्य जन्म सत्कारणी लागून माणसाला मुक्ति व मोक्ष या जगात मिळवून

देण्याचे कार्य कोण करीत असेल तर ते संतच. म्हणूनच "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती" या उक्तीस ते पात्र आहेत.

भगवान श्रीसाईबाबा, श्रीमेहेरबाबा, श्रीगजानन महाराज, श्रीमाणिक प्रभू, श्रीअक्कलकोट स्वामी, श्रीगाडगे महाराज इत्यादी संतांनी वर्णभेद व जातीयवादाला मूठमाती देऊन आपापल्या व्यवसायातील उत्तम उदाहरणे देऊन भक्तिमार्गात कोणतीही जातीयता आडवी न येऊ देता सर्व जातीतील, सर्व थरातील लहान-मोठी, श्रीमंत-गरीब पतीत यांना संसारात राहून भक्तिमार्गातून परमार्थाकडे नेण्याचा मार्ग सुकर केला याबद्दल ते खरोखरीच वंदनीय आहेत.

संत साईबाबांच्या साठाव्या पुण्यतिथीच्या निमित्याने बाबांच्या समकालीन संतांचा व त्यांच्या कार्याचा अल्पपरिचय लेखक-मंडळींनी या खास अंकाच्या निमित्ताने येथे करून दिला आहे. आमच्या वाचकांना खास अंकांच्या मालिकेतला हा तिसरा अंक आहे तो त्यांना आवडेल, वाचनीय व संग्राह्य वाटेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाही.


# श्रीसाईलीला

## श्रीसाई काव्यबहार विशेषांक

१ फेब्रुवारी १९७९ रोजी प्रसिद्ध होईल.

श्रीसाईलीला खास अंक मालिकेतील चौथा अंक

पंचम लेखक—कवी संमेलनात प्रकाशित होणार

## अनेक संतांचा सहवास लाभलेले कलामहर्षि

# श्री. दत्तात्रय कुशाबा उर्फ जाधव मास्तर

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

— श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅन्शन, ताडदेव, मुंबई ७

* श्रीसाईभक्तांनी अवश्य भेट देण्याजोगी एक वास्तू मुंबईच्या बांद्रे विभागातील कलानगर येथे आहे. त्या वास्तुचे नाव आहे 'गुरुप्रसाद', व तिचे मालक आहेत श्री. दत्तात्रय कुशाबा जाधव उर्फ 'जाधवमास्तर'

स्वकष्टार्जित अशा ह्या छोट्या व सुबक बंगलीच्या आवारात शिरताक्षणीच आपण एका थोर, ध्येयवेड्या, कलावंतांच्या व श्रीसाईभक्ताच्या घरात प्रवेश करत आहोत ह्याचे प्रत्यंतर पदोपदी येते. त्यांच्या दिवाणखान्याचा अर्धा भाग कलात्मकतेने व उंची फर्निचरने सजविलेला असून दुसरा अर्धा भाग 'श्रीसाईदर्शना' साठी मोठ्या भाविकतेने राखून ठेविलेला आहे.

ह्या अर्ध्या भागातील एका दालनात श्रीसाईनाथांची एक प्लास्टरची लाईफसाईज बसलेली मूर्ति असून तिची स्थापना १९५७ साली गुरुपौर्णिमेच्या दिवशी झाली. लोडाला टेकून बसलेल्या ह्या मूर्तीच्या चेहेऱ्यावर कमालीचे प्रसन्न भाव दिसून येतात. प्रथमदर्शनी प्रत्यक्ष श्रीबाबाच बसलेले आहेत असा भास होतो.

ह्या दालनाच्या नजिकच्या भिंतीत सुमारे दीड फूट खोल व दीड फूट उंच अशी शिरडीच्या समाधीची लाकडी प्रतिकृती मास्तरांनी बसविली असून ती हुबेहूब वठली आहे. ह्या समाधिमंदिरातील श्रीबाबांची मूर्ति रबराची बनविलेली आहे. ह्याशिवाय द्वारकामाईची एक सुबकशी प्रतिकृती ह्या दिवाणखान्यात पहावयास मिळते.



श्री. मास्तरांनी तयार केलेली श्रीबाबांची मूर्ती, शेजारी कु. विजयश्री जाधव पूजा करीत आहे.

श्री. जाधवमास्तरांच्या कल्पकतेची व कलात्मकतेची साक्ष पटविणारी दुसरी एक कलाकृती म्हणजे सोबतच्या छायाचित्रात दिसून येणारा एका काचेच्या लंबाकृती पेटीत त्यांनी उभा केलेला शिरडी येथील पालखीचा नयनरम्य देखावा! श्रीसाईबाबा व्यतिरिक्त इतर भक्तमंडळी–भालदार, चोपदार, श्याम सुंदर हा घोडा ह्यांच्या छोट्या रवरी आकृत्याद्वारे मशिदीतून चावडीकडे जाणाऱ्या पालखीचे मनोहर दृश्य ह्या कलाकृतीमध्ये पहावयास मिळते.

श्री. जाधवमास्तरांनी निर्माण केलेल्या श्रीसाईदर्शनाचे स्वरूप खाजगी असूनही ती पहावयास दूरदूरहून लोक येत असतात. आतापर्यंत महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण, गोव्याचे मुख्यमंत्री कै. दयानंद बांदोडकर, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. कन्नमवार, कणकवलीचे सत्पुरुष कै. श्री भालचंद्र महाराज, ठाण्याचे विद्यमानसंत श्री गजानन महाराज उर्फ आण्णासाहेब पट्टेकर अशा प्रमुख व्यक्तींनी वेळोवेळी भेटी देऊन श्री. जाधवमास्तरांच्या कलेचे कौतुक केले आहे. आपल्या मुंबईच्या वास्तव्यात श्रीगजानन महाराज हे निदान एकदातरी 'गुरुप्रसाद' येथे जाऊन श्रीसाईनाथांचे दर्शन न चुकता घेतात. "ज्या कोणाला शिरडीस जाणे शक्य होत नसेल त्याने 'गुरुप्रसाद'मधील श्रीबाबांचे दर्शन घ्यावे" असे ते आपल्या भक्तमंडळींना आवर्जून सांगतात.

वरील स्थानाच्या जागृततेविषयी अनेक सुरस अनुभव सौ. प्रमिला जाधव ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळतात. श्रीबाबांच्या अस्तित्वाची वारंवार जाणीव करून देणाऱ्या अनेक घटना ह्या स्थानात घडलेल्या आहेत. त्यामुळेच त्यांच्या आजुबाजूच्या परिसरातील बऱ्याच व्यक्तींचे 'गुरुप्रसाद' हे एक श्रद्धास्थान बनले आहे.

श्री. जाधवमास्तरांचे सध्याचे वय जवळ-जवळ साठ वर्षांचे असून गेली चाळीस वर्षे गिरगावात 'महिला कलामंदिर' ह्या संस्थेद्वारे स्त्रियांना कलेचे शिक्षण देण्याचे कार्य ते करीत आहेत. १ जानेवारी १९३६ रोजी अवघ्या दोन विद्यार्थिनी घेऊन स्थापन केलेल्या या संस्थेने आजतागायत

जवळजवळ १८००० स्त्रियांना कलेचे शिक्षण दिले आहे. त्यापैकी काहींनी स्वतःची कलामंदिरेही सुरू केली आहेत.

१९६८ साली श्रीसाईबाबांच्या पन्नासाव्या पुण्यतिथीनिमित्त मुंबईत परळ येथे झेवियर्स जिमखान्यावर भरलेल्या प्रदर्शनात श्री. जाधवमास्तरांनी शिरडीच्या समाधीमंदिराची आकर्षक प्रतिकृती बनविली होती. अवघ्या आठ-दहा दिवसांच्या अवधीत तयार केलेल्या ह्या कलाकृतीने श्रीसाईभक्तांचे प्रशंसोद्गार मिळविले होते.

मुंबईतील फॉर्जेटस्ट्रीट येथील व काँग्रेसहाऊस समोरील मंदिरातील श्रीबाबांच्या मूर्तिसुद्धा श्री. जाधवमास्तरांनी घडविल्या असून श्री. यशवंतराव चव्हाणांच्या पत्नी सौ. वेणूताई ह्यांना पुजेसाठी एक सुबक मूर्ति श्री. जाधव मास्तरांनी बनवून दिली आहे.

'महिला कलामंदिर'च्या कार्याचा वाढता व्याप लक्षात घेऊन भावी काळाची तरतूद म्हणून संस्थेची स्वतःची एक इमारत मुंबईत वाळकेश्वर जिक बँडस्टँड येथे मूर्त स्वरूप धारण करीत आहे. श्रीसाईनाथांच्या आशीर्वादाने श्री. जाधवमास्तरांचे स्वप्न साकार होणार ह्यात काय संशय ?

—☆—

## लालबागचे श्रीसाईभक्त संमेलन

* श्रीसद्गुरु साईनाथ सेवामंडळ, लालबागतर्फे २८ वे साईभक्त संमेलन सोमवार दि. ११-१२-७८ ते १७-१२-७८ पर्यंत लक्ष्मीवाडी, जयहिंद सिनेमा-जवळ अतीव उत्साहाने साजरे करण्यात आले. याप्रसंगी अनेक कलाकारांनी आपली उपस्थिती दिली व भक्तांनी दर्शनाकरिता चांगलीच गर्दी केली होती.

# श्रीसद्गुरु अक्कलकोट स्वामीमहाराज

******************************************

— सदानंद चेंदवणकर

कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला


दिगंबरा दिगंबरा

दिगंबरा दिगंबरा

श्रीपाद श्रीपाद

वल्लभ वल्लभ

दिगंबरा दिगंबरा



* * *

* भारताच्या आध्यात्मिक क्षितिजावर इ. सन १८५७ च्या सुमारास साऱ्या जगाचा आभास मावळून टाकण्यासाठी श्रीस्वामी समर्थरूपी अक्कलकोट स्वामी प्रगटले. अखिल भारताचे कोटकल्याण या अवतारी महापुरुषामुळे झाले आहे. श्रीदत्तात्रेयाचे भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती हे अवतार आहेत व आश्चर्याची गोष्ट म्हणजे श्रीनृसिंह सरस्वतींचाच अवतार किंवा साक्षात् श्रीनृसिंह सरस्वती म्हणजेच पूर्णब्रह्म भगवान श्रीसमर्थ स्वामी अक्कलकोट हे होत.

ते मंगळवेढे येथे १८३८ च्या सुमारास प्रकटले व इ. सन १८७८ मध्ये त्यांनी अक्कलकोट येथे समाधी घेतली. अक्कलकोट येथे त्यांचे ३३ वर्षे वास्तव्य होते. त्यांनी आपल्या अचाट योगसामर्थ्याने अनेक लीला चमत्कार, करून दाखविले. नृसिंहसरस्वती असेही त्यांना म्हणतात. श्रीस्वामीजी सर्व प्रकारच्या दीक्षा प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे देत असत. संकल्प दीक्षा हा त्यांचा प्रमुख दीक्षा-विधी असे. स्पर्श, दृष्टी, ध्यान, शब्द व संकल्प अशा या पंच महादीक्षा आहेत. त्या सर्वांत संकल्प दीक्षा ही सर्वोत्तम होय. श्रीसद्गुरू बाळप्पा महाराज, श्रीगंगाधर महाराज व श्रीगजानन-महाराज या स्वामींच्या परिवारातील तीन विभूती होत.

श्री अक्कलकोट स्वामींना दत्ताचा चौथा अवतार मानतात. स्वामींचा जन्म केव्हा व कुठे झाला, त्यांचे आईवडील कोण, गुरु कोण, त्यांनी साधन कोणते केले, दीक्षा कधी व कुणापासून घेतली याबद्दल अद्याप थांगपत्ता लागलेला नाही. स्वामींनी इ. स. १८७८ च्या चैत्राच्या वद्य त्रयोदशीस मंगळवारी दुपारी चार वाजता महानिर्वाण केले. या घटनेला नुकतीच शंभर वर्षे झाली आहेत.

श्रीसाईबाबांच्या हयात काळात महाराष्ट्रात वावरणारे श्रीस्वामी अक्कलकोट हे महापुरुष होत.


शिरडी समाधी मंदिरातील मूर्तीप्रमाणे हुबेहूब

**श्रीसाईबाबांची मूर्ती हवी ना !**

*
*
*

तर त्वरीत संपर्क साधा –

**श्री. डी. के. जाधव उर्फ जाधव मास्तर,**

'गुरुप्रसाद,' कलानगर, वांद्रा मुंबई–४०० ०५१

दूरध्वनी क्रमांक ५३८४४२

# श्रीसाईबाबांचे ज्येष्ठ गुरुबंधू श्री गजाननमहाराज

—प्रा. श्री. र. श्री. पुजारी एम. ए.
"रमानिवास," ९१२ सदाशिव पेठ, पुणे.

● अक्कलकोट श्रीस्वामी समर्थ व शिरडीचे श्रीसाईबाबा यांच्याप्रमाणेच शेगाव निवासी श्री गजानन महाराज यांचा जन्म, मातापिता अध्ययन याविषयी काहीही माहिती नाही. २३ फेब्रुवारी १८७८ रोजी विदर्भातील शेगावी ते प्रथम प्रकट झाले. तिथे बंकटलाल अगरवाल या रत्नपारखी तरुणास श्रीमहाराजांनी उकिरड्यावरील पत्रावळीमधील अन्नकण वेचून खात असताना दर्शन दिले. तेव्हापासून तो ८–९–१९१० या दिवशी समाधिस्त होईतोपर्यंत शेगावकरांना त्यांनी जीवनाचे धडे दिले. तो गिरवीत असता शेगावकरांनी ऐहिक व पारलौकिक अत्युच्च मूल्ये अनुभवली, जीवनाचा साक्षात्कार श्रींनी सर्वांना दिला. शेकडो लीला करून हजारोंच्या मनोकामना त्यांनी पूर्ण केल्या.

श्री गजाननमहाराज सिद्धकोटीतील पुरुष होते. त्यांना सर्व शास्त्रे, विद्या अवगत होत्या.

श्रीमहाराज बाह्यतः वेड्यासारखे राहात. ते विवस्त्र फिरत. त्यांचे बोलणे असे काही नसेच. वृत्तीस त्या त्या प्रसंगी स्फुरेल ती ती स्वैरवाणी ते उच्चारीत व तेच त्यांचे ब्रह्मवाक्य असे. पण त्या वाक्यात जगाच्या कल्याणाचे आशीर्वाद असत. त्यांची प्रत्येक उक्ती, कृती लोककल्याणाचे तळमळीने परिपूर्ण असे, यामुळे त्यांच्या लीलाचरित्रास वेद उपनिषदाचे मोल आहे. श्रीमहाराज 'गणिगण गणात बोते' या शब्दानी अकोटच्या श्रीनरसिंह महाराज या सत्पुरुषाच्या झोपडीसमोर बसून रात्रभर भजन करीत. त्यामुळे लोक त्यांना "गिणगिणे बुवा" म्हणत. भजनात ते इतके लीन होत की बोटावर बोटे आपटून नखांच्या आघाताने बोटांवर जखमा होऊन रक्ताच्या धारा लागत. ते योगी असल्याने इहलोकीच्या सर्व विकारापासून अलिप्त होते. लो. टिळक, दादासाहेब खापर्डे, कोल्हटकर वकील इ. थोरामोठ्यांनी महाराजांचे दर्शन घेऊन प्रसादही भक्तीपूर्वक ग्रहण केला होता.

श्रीसाईबाबा श्रीगजाननमहाराजांना आपले बंधू मानीत. महाराजांनी शेगावी देह ठेवला तेव्हा ते, "माझा मोठा जीव चालला, माझा गजा गेला" असे विव्हळून अनेकदा ओरडले, गडबडा लोळले व दिवसभर शोक केला. असे खापर्ड्यांनी लिहून ठेवले आहे.



श्रीगजानन महाराज, शेगाव

# श्रीसंत गाडगेमहाराज

— डॉ. श्री. दि. परचुरे, एम. ए. पी एच. डी.
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला



● शिरडीचे महान संत श्रीसाईबाबा ह्यांचे समकालीन असे जे संत होऊन गेले त्यात गाडगेमहाराजांचे एक असाधारण असे स्थान आहे. श्रीगाडगेमहाराजांनी भगवद्भक्तीचा प्रसार आपल्या कीर्तनांद्वारे केलाच; परंतु ते एकच ध्येय त्यांनी ठेविले नाही. सर्व समाजाला त्यांच्या वाईट व घातक सवयी व मनगुती यांतून मुक्त करण्यासाठी आपल्या उभ्या आयुष्यात त्यांनी अपरंपार कष्ट केले. त्यांच्या झंझावाती कीर्तनांच्या दौऱ्यांमुळे व त्यांचे शिष्य म्हणविणाऱ्या सुमारे १००–१५० प्रचारकांच्या कीर्तनांच्या रणधुमाळीमुळे उभा महाराष्ट्र व मराठवाडा ढवळून निघाला. श्रीसंत गाडगेमहाराज व त्यांचे अनुयायी यांनी जवळजवळ चाळीस वर्षे प्रचारकार्य करून महाराष्ट्रातील दोन पिढया घडविण्यासाठी जे कार्य केले ते खरोखरच अजोड होते अशीच साक्ष इतिहास दिल्याशिवाय रहाणार नाही.

अमरावती जिल्ह्यातील, दर्यापूर तालुक्यातील शेणगाव ह्या गावी श्री गाडगेमहाराज ह्यांचा जन्म २३–२–१८७६ ला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव होते झिंगराजी. ते जातीने परीट होते व परीटांचा कपडे धुण्याचा पिढीजात धंदा ते करीत असत. पूर्णाकाठच्या दापुरे गावच्या हंबीरराव कोळसकरांची मुलगी सखूबाई ही महाराजांची आई. झिंगराजीची थोडी फार शेती व कपडे धुण्याचा धंदा होता; पण त्याला दारूचे जबरदस्त व्यसन होते. त्यापायी तो सर्व घालवून बसला व त्याने गाव सोडले आणि आपला मावसभाऊ यादवजी ह्याचेकडे कोतेगाव येथे जाऊन राहिला.

गाडगेमहाराजांचे लहानपणीचे नाव डेबू असे होते. झिंगराजीची प्रकृति दारूमुळे पार खालावली होती आणि कोतेगाव येथे आल्यावर थोड्याच दिवसात ते मरण पावले, त्यामुळे सखूबाई आपल्या वडिलांकडे, हंबीररावांकडे, दापुऱ्यास आली.

डेबूजी पोरका पोर म्हणून हंबीररावांनी त्याला चांगला वागविला आणि त्यांच्या घरातील शेतीवाडीच्या कामात तो रमलाही चांगला. घरातील गुराढोरांची राखण करावी व शेतीचे काम अंगमोडून करावे असा डेबूजीचा कार्यक्रम होता. घरच्या शेतीमुळे खायला प्यायला भरपूर असे त्यामुळे डेबूजी प्रकृतीने चांगला धडधाकट झाला. पूर्णेच्या पाण्यात मनसोक्त पोहणे व भरपूर काम करणे ह्यामुळे त्याचे शरीर चांगलेच ताकदवान झाले. लहानपणी कमावलेल्या ह्या शरीराचा व काबाडकष्ट करण्याच्या सवईचा फायदा पुढील आयुष्यात बाबाना फार झाला.

डेबूजीला इतर सवंगड्यांसह भजन करावयाला फार आवडू लागले. तो जात्याच हुशार होता. परिस्थितीमुळे त्याला शालेय शिक्षण मिळाले नाही; परंतु त्याची ग्रहण-शक्ति चांगली असल्यामुळे तो ऐकून ऐकून अभंग व अध्यात्मपर दोहे, गाणी इत्यादि शिकला व पाठ म्हणू लागला. पुढे कीर्तनामध्ये ह्या सर्वांचा वापर, गाडगेमहाराज म्हणून प्रसिद्ध झाल्यावर, ते चांगल्या तऱ्हेने करू लागले.

डेबूजी पंधरा सोळा वर्षांचा झाला असता त्याचे लग्न कुंतावाई नावाच्या सात-आठ वर्षांच्या मुलीबरोबर करून देण्यात आले. कमालपूर येथील धनाजी खल्लाटकर ह्यांची ही मुलगी. दापुऱ्याजवळच सांगवीदुर्गडे गावचे तिडके सावकारा-कडून डेबुजीच्या आजोबांनी काही कर्ज काढले होते. त्यापोटी वेळोवेळी पैसे भरले होते; पण सर्व पावत्या घेतलेल्या नव्हत्या. त्याचा फायदा घेऊन त्या सावकाराने हंबीररावाकडे देणे काढले व त्याच्या जागेचा ताबा घेण्याचा घाट घातला; पण एकट्या डेबूजीने सावकार व त्याचे भाडोत्री पुरभय्ये ह्यांना तोंड देऊन सावकाराला परतवून लावले.

डेबूजीला लग्नानंतर पहिली मुलगी योग्यवेळी झाली तिचे नाव आलोका. तिच्या मागून दुसरी मुलगी झाली तिचे नाव कलावती. तिच्या पाठोपाठ दोन वर्षांनी मुलगा झाला. त्याचे नाव मुग्दल, परंतु तो अल्पजीवी ठरला. देवीला बकरा, कोंबडी वगैरे बळी दिला नाही, लोकांना दारू पाजली नाही म्हणून देवीने मूल उचलून नेले असे लोक म्हणू लागले. ह्यावर काय बोलावे हे डेबूजीस कळेना व तो उदासवाणा झाला. अशाच परिस्थितीत १९०५ साली खैरीच्या रानात ज्वारीची

राखण करण्यासाठी डेबूजी बाहेर पडला असता त्याला खैरी गावाकडून येणारा एक पुरुष भेटला. त्याचे व डेबूजीचे काय बोलणे झाले हे कोणालाच कधीच कळले नाही; परंतु त्यानंतर दोन-चार दिवसातच गावात एक कीर्तनकार आला. त्याच्या कीर्तनास गेलेले डेबूजी पार भारावून गेले आणि कीर्तन संपल्यावर घरी आले तसेच अंगावरील कपडे, अंगणात पडलेले एक गाडगे व पलीकडेच पडलेली एक काठी ह्यासह घराबाहेर पडले ते लोकोपकारासाठी जन्मभर काम करण्याच्या उद्देशाने ! राजपुत्र सिद्धार्थ आपली पत्नी व मुलगा ह्यांना अशाचप्रकारे पाहून घर सोडून निघून गेला होता व पुढे बुद्ध झाला. त्याचप्रमाणे डेबूजीनीही घरात स्वस्थ झोपलेल्या कुन्ताबाईकडे व आलोका आणि कलावती ह्या आपल्या कन्यांकडे एक प्रेमपूर्ण दृष्टिक्षेप केला व आपले अश्रू आवरून अत्यंत कठोर मनाने त्यांनी घराबाहेर गुपचूप प्रयाण केले !

इकडे दापुऱ्यात व जवळपासच्या गावी पुष्कळ शोधाशोध झाली; पण काहीच पत्ता लागला नाही ! सरतेशेवटी ऋणमोचन येथील जत्रेला जाण्याच्या त्यांच्या पूर्वीच्या नियमाप्रमाणे ते तेथे सापडतील ह्या उद्देशाने सखूबाई, कुंताबाई वगैरे मंडळी तेथे यात्रेस गेली व त्यांची व डेबूजीची गाठ तेथे पडली पण त्यांची हरप्रकारे विनवणी करूनही घरी परत येण्यास नकार दिला. तसेच आपले उरलेले आयुष्य लोकसेवेसाठी वेचण्याचा निर्धार त्यांनी त्यांच्याशी व्यक्त केला !

घरातून बाहेर पडताना जे गाडगे डेबूजीजवळ होते ते कित्येक वर्षे त्यांच्या हाती दिसत असे आणि त्याच्याचमुळे पुढे त्याना लोक गाडगेमहाराज या नावाने ओळखू लागले. लहानपणापासून गाडगेमहाराजांनी आपल्या आजूबाजूची परिस्थिती काळजीपूर्वक न्याहाळली होती. तसेच गृहत्याग केल्यावर महाराष्ट्रातील खेड्या-पाड्यात हिंडत असताना खेड्यातील दुरावस्थेची त्यांना विशेषकरून जाणीव झाली. दारूच्या व्यसनापायी व लग्नकार्यात आहाराबाहेर खर्च करण्यामुळे लोक कर्जबाजारी झालेले, शिक्षणाच्या अभावामुळे खोट्या समजुती सर्वत्र पसरलेल्या, बुवा व भगत ह्यावर लोकांचा भोळा विश्वास, कोंबडी, बकरी इत्यादि देवीला, म्हसोबाला बळी देण्यावर भर इत्यादिमुळे त्रस्त झालेला बहुजन समाज पाहून ह्या समाजाला वर आणण्यासाठी, त्याचा उद्धार करण्यासाठी काहीतरी करावे ही तळमळ त्यांना लागली त्याकरिता त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन जत्रातून झाडझूड करून लोकांना स्वच्छतेचे धडे दिले की ज्यामुळे देवी, महामारी ह्यासारखे रोग कमी व्हावेत तसेच आपल्या प्रासादिक वाणीने कीर्तने करण्यास सुरुवात केली.

श्रीसंत गाडगेमहाराजांचे कीर्तन हा एक आगळाच अनुभव असे. त्यांची

एकतारी हीच केवळ त्यांच्या कीर्तनाची साथ. जागा कधीच ठरलेली नसे. सुरुवाती सुरुवातीला तर एकाद्या गावातील मध्यवर्ती देवळाजवळचे पटांगणच महाराज आपल्या कीर्तनासाठी निवडीत व दिवाबत्तीची वाट न पहाताच आपल्या बुलंद आवाजात अभंग म्हणण्यास सुरुवात करीत. त्यांचे सुरेल गाणे ऐकून मग लोक आपोआप जमा होत. पुढेपुढे तर यात्रा, सप्ताह वगैरेमध्ये गाडगेमहाराजांचे कीर्तन म्हणजे एक मोठेच आकर्षण असे आणि त्यावर लोकांच्या उड्या पडत. महाराज मोठा वेदांत सांगण्याचा आव कधीच आणीत नसत. लोकांच्या परिचयाच्या गोष्टी सांगून ते त्यांच्या अंतरंगात शिरत व हसत हसत त्यांना सुधारण्याचा उपदेश करीत. कीर्तन आटोपताच महाराज कीर्तनाच्या ठिकाणाहून दूर निघून जात व कोणालाही पाया पडू देत नसत. एकाद्याने प्रयत्न केलाच तर ते त्याच्या पाठीत काठी मारीत.

तीर्थांच्या ठिकाणी होणारी यात्रेकरूंची गैरसोय पाहून गाडगेमहाराजांनी त्यांची सोय करण्यासाठी पंढरपूर, नासिक, पुणे, देहू, आळंदी इत्यादि ठिकाणी धर्मशाळा, अन्नछत्रे वगैरे बांधली. समाजातील खालच्या म्हणून गणल्या गेलेल्या समाजाबद्दल त्यांच्या मनात विशेषच कणव होती म्हणून त्यांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र धर्मशाळा बांधल्या. पंढरपूरची चोखामेळा धर्मशाळा ही अशापैकीच एक होय. हरिजन, लुळे-पांगळे, आंधळे व महारोगी आणि निराधार म्हातारे ह्यांच्याबद्दल त्यांच्या मनात विशेष अनुकंपा असे व शक्य तेथे ते स्वतः ह्या लोकांची सेवा करीत. मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर ह्यांनी महाराजांचे कार्य पाहून त्यांना जागोजाग हिंडण्याचे कष्ट कमी व्हावेत म्हणून एक मोठी मोटार त्यांना दिली व त्यातून प्रवास करण्यास विनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही महाराजांच्या सेवेच्या कार्यासाठी विशेष आदर होता व त्यांचे महाराजांशी घनिष्ट संबंध होते. संतांच्या आयुष्यात चमत्कार घडतात असे आपण नेहमी ऐकतो. श्रीगाडगेमहाराजांच्या सारख्या काहीच पैसा नसणाऱ्या माणसाने घाट, धर्मशाळा, वृद्धाश्रम, अन्नछत्र इत्यादी सुमारे पन्नास लाखांची कामे लोकांकडून देणग्या मिळवून केली हा काय लहान चमत्कार होता काय ? ह्या लोकोत्तर संताने १९–१२–५६ ला समाधी घेतली. " तुका म्हणे आता राहिलो उपकारापुरता " ह्या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे १९०५ ला घर सोडल्यापासून सुमारे ५१ वर्षे महाराज आपले जीवन केवळ परोपकाराकरिताच जगले स्वतःकरिता नाहीच !

# श्रीउपासनी महाराज

आणि

## त्यांचे सांस्कृतिक कार्य

—डॉ. शां. ना. टिपणीस, एम. ए. पी.एचडी.
श्रीउपासनी कन्याकुमारी आश्रम, साकुरी

● नगर जिल्ह्यात साकुरी हे अगदी छोटसं खेडं आहे. कित्येक वर्षे त्याची कुणाला माहितीहि नसेल. परंतु श्रीउपासनी महाराज नामक एका सिद्धपुरुषाने येथे वास्तव्य केले, आणि या खेड्यास महत्त्व प्राप्त झाले. श्रीउपासनी महाराजांच्या विभूतिमत्त्वाने साकुरी हे एक क्षेत्राचे स्थान बनले आहे.

श्री उपासनी महाराज नाशिक जिल्ह्यातील सटाणे ग्रामी इ. स. १८७० साली जन्मास आले. बालपणापासूनच त्यांना आध्यात्माची ओढ होती व तत्वचिंतनाचे वेड होते. या आत्मसाक्षात्काराच्या तळमळीनेच त्यांना घरातून बाहेर काढले, आणि त्यांनी तपश्चर्येची वाट चोखळली. सद्गुरुंच्या शोधार्थ असता शिरडीच्या श्रीसाईबाबांची भेट झाली. (१९१०) साईबाबांच्या आज्ञेवरूनच त्यांनी शिरडीस चार वर्षे काढली. साईनाथांच्या कृपेने सिद्धावस्था प्राप्त करून अनेक ठिकाणी भ्रमंती केल्यावर या महापुरुषाचे पाय साकुरीस विसावले. महाराजांनी गावाबाहेरील स्मशानात वास्तव्य केले. महाराजांच्या प्रभावामुळे स्मशानाचे वैकुंठ-कैलासात रुपांतर झाले व शून्यातून एक महान सांस्कृतिक केंद्र आणि धर्मपीठ निर्माण झाले.

आरती, भजन-पूजन आणि अन्य सत्कर्मे यांनी आश्रमातील दैनंदिन कार्यक्रम भरगच्च भरलेला असतो. नियोजित वेळी ठराविक सत्कर्मे अत्यंत पद्धतशीरपणाने व शास्त्रशुद्धरीतीने होत असतात. सत्कर्मांचे हे सत्र रात्र-दिवस चालू असते. दिवसभरच्या कार्यक्रमाची मांडणीच अशाप्रकारे आखण्यात आली आहे की, साधकाचा दरेक क्षण भगवत्‌चिंतनात जावा. सकाळी उठल्यापासून रात्री निद्राधीन होईपर्यंत प्रत्येक जण कुठल्या ना कुठल्या सत्कर्मात गुरफटलेला असतो. त्यामुळे भगवंताचे अनुसंधान टिकविण्यास सहाय्य होते.

साकुरी-स्थानात होणाऱ्या सत्कर्मांचा सातत्याने विचार केला की तेथे भक्तिमार्गाचा पुरस्कार केलेला आढळून येईल. तिथे अखंडपणे चाललेले भजन-पूजन,

नाम-संकीर्तन आणि साजरे केले जाणारे उत्सव तेथे नांदणाऱ्या भागवत-धर्माचीच ग्वाही देतात. भक्तीमार्गाबरोबर निष्काम कर्मयोगाची मांडणीही तेथे बघावयास मिळते. महाराजांचा निष्काम कर्म करण्यावर भर होता. त्यामुळे आपणास तेथे भक्तियोग आणि कर्ममार्गाच्या मधुर मीलनाचे गंगाजमनी मनोहर दृश्य पहावयास सापडते. ध्यानमार्ग बहुजनसमाजास पेलवणारा नाही, असे महाराजांचे निश्चित मत होते. म्हणून ध्यान-मार्गावर त्यांनी विशेष भर दिला नाही. उलट सामान्य मानवास मानवेल असा भक्तीचा आणि निष्काम सेवेचा चोखट मार्ग त्यांनी दाखवून दिला.

साकुरी खेरीज महाराजांनी सटाणा, नागपूर, सुरत आणि हैद्राबाद या ठिकाणी आश्रमाच्या शाखांची स्थापना केली. महाराज विद्यमान असताना भारतभर त्यांनी संचार केला. त्यामुळे महाराजांचा कीर्तिपरिमल सर्वत्र दरवळत होता. त्यांची कीर्ती ऐकून त्यांच्या दर्शनार्थ भारताच्या विविध प्रांतातून हजारो माणसे आकर्षिली गेली. आणि महाराजांची निष्ठावंत भक्त बनली. काहीनी आपल्या मुलुखातील जमिनी महाराजांस देऊ केल्या आणि अशाप्रकारे त्या त्या ठिकाणी आपोआपच आश्रमाची निर्मिती झाली.

कन्याकुमारीस्थान आणि यज्ञसंस्था ही महाराजांच्या कार्याची आणि आश्रमाची लोकोत्तर वैशिष्टये होत. श्रीउपासनी महाराज १९४१ मध्ये समाधिस्थ झाल्यावर त्यांच्या पश्चात् त्यांच्या परम शिष्या परमपूज्य श्री गोदावरी माताजी त्यांचे कार्य पुढे चालवीत आहेत.

भारतात ब्रह्मवादिनी स्त्रियांचे मठ फार थोडे आहेत. साकुरीतील कन्याकुमारीस्थान त्यामध्ये अग्रगण्य आहे. आश्रमात अदमासे ४० कन्या राहातात. अध्यात्मिक तत्त्वासाठी त्यांनी आपले जीवन समर्पण केले आहे. आरती, भजन-पूजनादि सत्कर्मात त्या निरंतर निमग्न असतात. माताजी म्हणजे त्या कन्यांमधील मेरुमणी आहे. महाराजांच्या कार्याचे ते गौरीशंकर आहे.

यज्ञसंस्था ही साकुरी-आश्रमाची अपूर्वाई आहे. श्रीउपासनी महाराजांनी यज्ञसंस्थेचे बीजारोपण केले व श्री माताजींनी यज्ञसंस्थेच्या कार्याचा विस्तार केला आहे. श्री माताजींच्या नेतृत्वाखाली कन्या वर्षातून ७ यज्ञ करतात. साकुरीखेरीज भारतातील प्रमुख ठिकाणी श्री माताजींनी यज्ञ केले असून याज्ञिक कार्याचे लोण दूरवर पोचवले आहे.

स्त्री-धर्माची जागृती करणे व स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नतीस सहाय्य करणे, हे कन्याकुमारीस्थानाचे उद्दिष्ट आहे. स्त्री-धर्मास आलेली काजळी दूर करून स्त्री-धर्माचे निशाण त्याने डौलाने फडकत ठेवले आहे.

श्रीउपसनी महाराजांचे वाङ्मय हेहि त्यांच्या सांस्कृतिक कार्याचे महत्त्वाचे अंग आहे. महाराजांनी जगास जे तत्त्वज्ञान सांगितले, त्या तत्त्वज्ञानाच्या भरभक्कम पायावरच त्यांच्या कार्याचा इमला उभा आहे. महाराज विद्यमान असता त्यांची उत्स्फूर्त प्रवचने होत. ती सर्व 'उपासनी वाक्सुधा' या नावाने प्रसिद्ध आहेत. सुमारे पाच हजार पृष्ठांचा त्यांचा वाङ्मयीन संसार आहे. मोक्ष, मुक्ति, संत, सद्‌गुरू, मनोनिग्रह वगैरे विविध विषयांचे त्यांनी विवेचन केले आहे. स्वानुभवाच्या बैठकीवर त्यांची प्रवचने अधिष्ठीत असून त्यांचे शब्द वाचकांच्या काळजास जाऊन भिडतात. तत्त्वज्ञानाचे गहन सिद्धान्त त्यांनी अत्यंत साध्या व सोप्या शब्दात सांगितले असून आपल्या प्राचीन सांस्कृतिक विचारांचा खजिना आणि वारसा जतन करून सामान्य जनांच्या हवाली केला आहे.

बहुजनसमाजास भक्तिमार्गास आणि सन्मार्गास लावण्यासाठी स्थापन केलेले उपासना केंद्र, स्त्री-धर्माची जागृति करण्यासाठी निर्माण केलेले कन्याकुमारीस्थान यज्ञसंस्था आणि महाराजांचे ग्रंथ भांडार अशी महाराजांच्या कार्याची विविध वैशिष्ट्ये आहेत.

श्रीउपासनी महाराजांच्या कार्याचा महाराष्ट्र हा मध्यबिंदु असला तरी त्यांच्या सांस्कृतिक कार्याची व्याप्ति भारतभर झाली असल्याचे दिसून येते. गुजराथ, उत्तर प्रदेश, मध्य भारत, बंगाल, संयुक्तप्रांत अशा भारताच्या विविध प्रांतामधून साकुरीस यात्रेकरूंची रीघ लागलेली असते. त्यावरून महाराजांनी सुरू केलेल्या सांस्कृतिक चळवळीने कसे देशव्यापी स्वरूप धारण केले आहे, हे ध्यानात येईल. महाराजांच्या विचारांच्या वर्चस्वाखाली भारतातील विविध मुलुख आले असून वैदिक धर्माची पताका त्यांनी मोठ्या दिमाखाने फडकत ठेवली आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीची डिंडिम सतत वाजत ठेवून जनतेत वैचारिक जागृतीचे केवढे प्रचंड अन् पर्वतप्राय कार्य त्यांनी करून ठेविले आहे हे कुणाही विचारवंताच्या यावरून ध्यानात येण्याजोगे आहे. ●

## श्रीसाईचरणी विलीन

● मुंबईचे विख्यात साईभक्त व नामवंत संगीत दिग्दर्शक श्री. दत्तात्रय पांडुरंग उर्फ अण्णासाहेब कोरगावकर यांचे ७१ व्या वर्षी २३-१२-७८ ला हृदयविकाराने देहावसान झाले.

+ बिदरचे प्रसिद्ध साईभक्त डॉ. विठ्ठलराव यांचे १४-१२-७८ रोजी निधन झाले.

# श्रीमाळीबाबा व श्रीहजरतबाबा जान

—डॉ. के. भ. गव्हाणकर
इंदिरा निवास, लालबहादूरशास्त्री मार्ग,
कुर्ला, मुंबई ७०

## पुण्याचे श्री माळीबुवा

पुण्यास चैत्र शु. ७ ( २६–३–१९३१ ) ला समाधिस्थ झालेले श्री माळीबुवा म्हणून एक सिद्ध पुरुष होऊन गेले ते श्रीसाईंचे समकालीन. त्यांना अतींद्रिय किंवा दिव्य-दृष्टी-श्रुती सिद्धी सद्‌गुरुकृपेने, भक्तीने व पूर्वपुण्याईनेच प्राप्त झाली होती.

शाळेत कधी न गेलेला हा पूर्ण अडाणी मुलगा १७।१८ वर्षांचा असताना भ्रमिष्टासारखा वागे. पुढे तो टांगा हाकीत असे. हल्ली जेथे त्यांची समाधी आहे त्या ठिकाणी काही शतकांपूर्वी नागेंद्रनाथांची समाधी होती. तिला तो नित्य नेमाने पाणी-गंध-फूल वाही. कालांतराने एके दिवशी त्यांची पूर्वपुण्याई उदयास आली म्हणा, की गुरुकृपा झाली म्हणा. समाधिस्थ नागेंद्रनाथाच्या आराधनाने त्यांची तिथे समाधीच लागली. त्या समाधीनंतर त्यांना भूत, भविष्य, वर्तमान सर्व एकदमच दिसू लागले. त्यामुळे चकीत होऊन त्यांनी तेथेच आपले आसन ठोकले, आणि शेवटपर्यंत त्याचजागी ते होते. या वेळेपासून त्यांना जी ही अतींद्रिय दृष्टीची सिद्धी प्राप्त झाली ती शेवटपर्यंत होती. तिच्यामुळे त्यांचे अनेक नामांकित व सुशिक्षित लोकही शिष्य झाले. त्यांच्या सिद्धीच्या काही प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोष्टी रावसाहेब मुळे, बर्वे, दादासाहेब खापर्डे, भाऊसाहेब पेठे (पोलीस प्रॉसिक्युटर) वगैरेना माहित होत्या.

एकदा रावसाहेब पटवर्धनांची बदली एडन येथे झाली. वरिष्ठाचा हुकूम आला आणि रावसाहेब त्या सर्व तयारीला लागले. नेहमीप्रमाणे कचेरीतून येताना त्यांनी श्रीमाळीबाबांना ही हकीकत कळवली. बाबांनी सांगितले की, ‘ शंकरराव तुम्ही काही सध्या एडनला जात नाही हे नक्की ’ रावसाहेबांना

ते उमजेना. हुकुमाप्रमाणे ७ दिवसात त्यांनी चार्ज दिला आणि जाण्याची सर्व तयारी केली. जाण्याच्या दिवशी सकाळी बाबांना नमस्कार करून जावे म्हणून ते तेथे गेले. पुन्हा बाबांनी तेच सांगितले. पण पटावे कसे? पण विस्मयाची गोष्ट अशी की, रावसाहेब घरी येतात तो हातात तार पडली की, 'तुमची बदली रद्द झाली आहे.' बाबांचे म्हणणे शेवटी खरे झाले.

कै. नारके श्रीसाईबाबांचे एक भक्त श्री माळीबुवांकडे गेले आणि म्हणाले, बाबा, शिरडीच्या साईबाबांकडे मी गेलो तो ते एका बाईला अद्वा तद्वा शिव्या देत होते. मी परत आलो. श्री माळीबुवा हसले आणि म्हणाले, 'अरे! तो हीरा आहे. जीला शिव्या दिल्या त्या बाईला जाऊन भेट, तिला मुलगा झाला. त्यांची करणी तुला काय कळणार?' आणि ते खरे ठरले. त्यानंतर प्रो. नारके बाबांचे एकनिष्ठ भक्त झाले.

### श्रीहजरत बाबाजान

पुण्यात दुसरी एक व्यक्ति श्रीसाईबाबांच्या समकालीन होती. त्या पै. बाबाजान होत. त्यांची समाधी पुणे येथे भोपळे चौकात जुन्या कँप एज्युकेशन सो. च्या शेजारी आहे.

बाबासाई, बाबाजान व बाबाताजुद्दिन यांच्या गप्पा चालावयाच्या. त्या पुणे येथे एका कडुलिंबाच्या झाडाखाली रहात होत्या.

# १७ वे अखिल भारतीय श्रीसाईभक्त अधिवेशन

## यशस्वी साजरे झाले

अखिल भारतीय श्रीसाईभक्तांचे १७ वे अधिवेशन पुणे येथील पोलिस रिक्रिएशन हॉलमध्ये शनि. दि. ९ डिसें. ७८ रोजी अतीव उत्साहाने साजरे करण्यात आले. अखिल भारतातून विशेषतः दक्षिण भारतातून अधिक अशी सुमारे तीनशेवर स्त्री-पुरुष मंडळी या अधिवेशनास हजर होती. मद्रासच्या अखिल भारतीय साई समाजाचे अध्यक्ष महामना श्रीराधाकृष्ण स्वामीजी उर्फ साईपादानंद यांनी या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान मंडित

केले होते. हे अधिवेशन श्रीसाईदास मंडळ, पुणे व अखिल भारतीय साई-समाज, मद्रास यांच्या विद्यमाने भरविण्यात आले होते.

दि. ९ रोजी सकाळी साईदास मंडळाच्या शिवाजीनगर येथील श्रीसाई मंदिरात राधाकृष्ण स्वामींच्या उपस्थितीत मंत्रोच्चारपूर्वक लक्षअर्चना होऊन दुपारी ३ वा. या मंदिरातून श्रीसाईबाबा व श्रीनरसिंहस्वामीजी यांच्या प्रतिमांची सवाद्य मिरवणूक निघून ती राहुल चित्रपटगृहासमोरील पोलिसहॉलवर नेण्यात आली; व त्यानंतर अध्यक्षांचे सुस्वागत करण्यात आले. या अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे योजना व अर्थमंत्री ना. श्री. शंकरराव चव्हाण हे करणार होते परंतु ऐनवेळी ते नागपूरहून न आल्याने त्यांचे भाषण रिझर्व्ह बँकेच्या वरळी शाखेचे एक वरिष्ठ अधिकारी श्री. जी. आर. इनामदार यांनी वाचून दाखविले. त्या भाषणाचा मराठी अनुवाद डॉ. श्री. दि. परचुरे यांनी कथन केला. तसेच श्रीराधाकृष्णस्वामी-जींच्या आंग्ल भाषणाचाही मराठी अनुवाद त्यांनी सांगितला. या अधिवेशन प्रसंगी प्रा. र. श्री. पुजारी, श्री. सूर्यकांत गर्जे, श्रीमती मणि साहूकार, डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर, साईदास मंडळाचे कार्यवाह श्री. रामकृष्णन् व अध्यक्ष श्री. पी. एस. राव यांची भाषणे झाली.

रविवारी दि. १० रोजी सकाळी मॉडेल कॉलनी मॅरेज हॉलमध्ये भर-लेल्या खुल्या अधिवेशनात भक्तांनी श्रीबाबांचे विषयीचे आपापले अनुभव थोडक्यात पेश केले व सायंकाळी भजन, किर्तन गायन इ. च्या गच्च कार्यक्रमात अधिवेशन समाप्त झाले. संमेलनाला आलेल्या मंडळींची निवास, भोजन, चहापान, कॉफीपान इ. ची उत्कृष्ट व्यवस्था वरील दोन्ही संस्थांनी उत्कृष्ट ठेवली होती. अधिवेशनाचे सुरुवातीस प्रा. पुजारी यांची कन्या कु. जयश्री हिने स्वागतगीत गायिले. शिरडीत भरविण्यात आलेल्या बाबांच्या ४४ मंदिरातील फोटोंचे प्रदर्शन येथेही भरविण्यात आले होते. मुंबईहून श्रीसाईलीला मासिकाचे उभय कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर यांना मुद्दाम आमंत्रित करण्यात आले होते. अधि-वेशनप्रसंगी एक सुंदर इंग्रजी-मराठी लेखांची स्मरणिकाही प्रकाशित करण्यात आली.

# श्रीसद्गुरु ताजुद्दीनबाबा

-डॉ. अनिल जायस्वाल, एम्. बी. बी. एस.
द्वारा श्रीसाई क्लिनिक,
चितारओळ, नागपूर-२.

* श्रीक्षेत्र शिर्डीचे श्रीसाईबाबा, शेगावचे श्री गजानन महाराज व नागपूरचे श्रीताजुद्दीनबाबा हे समकालीन संत होऊन गेले.



## * श्री ताजुद्दीनबाबा *

श्रीताजुद्दीन बाबांचा जन्म तारीख १७ जानेवारी इ. सन १८६१ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव हजरत सैय्यद बदरूद्दीन व आईचे नाव मरीयम बी होते. अनेक चमत्कार दाखविणाऱ्या या चमत्कारिक संताचा जन्मसुद्धा चमत्काराने

परिपूर्ण होता. जन्मल्याबरोबर ते सर्वसाधारण मुलासारखे रडले नाहीत की हातपाय-सुद्धा हलविले नाहीत. त्यावेळेस उपलब्ध असणाऱ्या चिकित्सा–प्रणालीनुसार लोखंडाच्या तारा लालभडक तापवून त्यांच्या माथ्याला कित्येकदा डागण्यात आल्या. तेव्हा कुठे यांचा रडण्याचा आवाज पसरला.

श्रीताजुद्दीनबाबांचे वय दहा–अकरा महिन्यांचे असेल नसेल तोच त्यांचे वडील वारले. व वयाच्या नवव्या वर्षीच त्यांच्या मातोश्री स्वर्गवासी झाल्या. बालपणीच 'ताज' अनाथ झाला. लहानपणापासून त्यांना ईशचिंतनाची फार आवड. तरीपण वयाच्या अठरा वर्षापर्यंत त्यांनी कसेबसे शिक्षण संपादन करून अरबी, फारसी, उर्दू व इंग्रजी भाषांचे ज्ञान प्राप्त केले.

एकदा त्यांचे शिक्षक त्यांना शिकवित असताना अनायासे त्या शाळेत श्री संत अब्दुला यांचे येणे झाले. ते त्या शिक्षकास म्हणाले,—

"अरे, याला काय शिकवितोस, हा तर पूर्वीच शिकून आलेला आहे."
नंतर ते संत ताजुद्दीनास उद्देशून म्हणाले,—

"कमी खायाचे,
कमी निजायाचे,
कमी बोलायचे–ये याद रख।"

इतके म्हणून त्यांनी आपल्या खांद्यावर लटकविलेल्या झोळीतून काढलेले फळ स्वतः खाल्ल्यावर त्याचा शेष राहिलेला तुकडा श्रीताजुद्दीनास खावयास लावला. त्या क्षणापासूनच श्रीबाबांमध्ये फार फरक जाणवू लागला. तीन दिवसपर्यंत ते एकसारखे रडत राहिले, व त्यांच्या कमलनयनांतून सारखे अश्रू वहात राहिले.

शिक्षण संपविल्यावर श्रीबाबा कामठीला असणाऱ्या मिलिटरी फलटन नंबर तेरामध्ये भरती झाले. त्यांच्यात असताना श्रीबाबांना देश–विदेशात भ्रमण करावे लागले. फ्रान्स वगैरे अनेक ठिकाणी ते जाऊन आले. शेवटी श्रीबाबांना मध्यप्रदेशच्या सागर जिल्ह्यातील मिलिटरीतच काही काळ काढावा लागला. त्यांच्या डेऱ्यानजीकच असणाऱ्या जंगलात, श्रीसंत दाऊद चिश्ती यांची एक फार जुनी समाधी होती. त्याच समाधीच्या दर्शनाला श्रीबाबा नियमितपणे जात असत. तिथे ऊद वगैरे जाळून श्रीबाबा उदबत्त्या व दिवे लावीत. काही काळ त्या समाधीजवळ बसून ईशचिंतन व ध्यानधारणा करीत. एकदा ईशचिंतनात भक्तीभावाने–गुंग अव-

स्थेत असताना त्यांना साक्षात्कार झाला. आत्मा व परमात्माचा भेदभाव पार वितळून गेला व श्रीबाबा स्वतः ईश्वराशी एकरूप झाले. या संसारातील मायेचा प्रपंच त्यांना नकोसा झाला. श्रीबाबांनी मिलिटरीची नोकरी सोडून दिली. श्रीबाबा त्याच गावात लोककल्याणार्थ इकडे तिकडे हिंडू लागले. त्यांना त्यांच्या स्वतःची शुद्ध नव्हती. कोणी दिले तर खावे, प्यावे व मोजकेच बोलावे. बहुधा ते एकांतात बसलेले आढळत.

एका रात्री श्रीबाबा कामठीतील एका इंग्रजी क्लबासमोर जाऊन अगदी नंग धडंग उभे झाले. तिथे असणाऱ्या गोऱ्या स्त्री-पुरुषांना असल्या कुचेष्टा करणाऱ्या या वेड्याचा राग आल्यामुळे त्यांनी श्रीबाबांना पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यांच्या त्या गैरवागणुकीबद्दल त्यांच्यावर खटला चालविण्यात आला व ता. २६ ऑगस्ट इ. सन १८९२ साली न्यायाधिशाने हुकूम काढला. त्यानुसार त्यांना नागपूर येथील वेड्यांच्या इस्पितळात हालविण्यात आले व तिथेच पुढे श्रीताजुद्दीनबाबांनी जवळ-जवळ सोळा वर्षे निवास केला.

या पागलखान्याचे डॉक्टरसाहेब स्वतः पागलखान्यात असणाऱ्या या पागल म्हणविणाऱ्या बाबांचे पहिले भक्त झाले. 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणीप्रमाणेच हळूहळू वेड्यांच्या इस्पितळाचे सर्व कर्मचारी श्रीताजुद्दीनबाबांचे निस्सीम भक्त बनले.

जे स्थान श्रीसाईबाबांना आहे तेच स्थान श्रीबाबा ताजुद्दीनला आहे. तेसुद्धा या नि स्वार्थ प्रेम, सेवा व निःस्वार्थ भक्तीचे भुकेले आहेत. स्वार्थी भक्त तर अनेक गोळा होतात व असाच भक्त समुदाय वेड्यांच्या इस्पितळातसुद्धा श्रीताजुद्दीन बाबांच्या भोवती गोळा झाला होता. दिवसेंदिवस एका कानावरून दुसऱ्या कानावर गोष्ट जाऊन श्रीताजुद्दीनविषयी बरीच प्रचिती झाली व त्या पागलखान्यात पागल नसणारे सर्व-साधारण लोकसुद्धा श्रीबाबांच्या दर्शनार्थ येऊ जाऊ लागले, व यावर कोणीच आक्षेप घेतला नाही हे पण तितकेच खरे.

'तारा' नावाची एक भक्तीण श्रीबाबांच्या दर्शनार्थ आली असताना तिने आपल्या बरोबर स्वतःच्या हाताने भक्तीभावाने व श्रद्धेने तयार केलेली भोजनसामुग्री शिदोरीत बांधून आणलेली होती. परंतु श्रीबाबा त्यावेळेस राजमहालात असल्यामुळे तिला ती शिदोरी श्रीबाबांना देण्याची हिंमतच झाली नाही. तिने तिथेच एका वृक्षाला लटकवून ठेवून दिली व दुरूनच श्रीबाबांचे दर्शन घेत उभी राहिली. श्रीबाबांच्या जेवणाची वेळ झाली असताना अनेक पक्वान्नांनी भरलेले सोन्याचे ताट घेऊन

श्रीमंत राजे रघुजीराव भोसले हे स्वतः त्यांच्या सेवेत उभे झाले. श्रीबाबा म्हणाले,—

" मुझे ये नहीं वो लावो जो पेडपर टंगा है "

अर्थातच सेवकांनी हजर केलेली ' ताराची शिदोरी ' श्रीबाबांनी ग्रहण केली. दुरूनच पहात असणारी तारा सुखावली, कृतार्थ झाली. ही घटना शेवगावचे श्रीगजानन महाराजांच्या जीवनचरित्रात उल्लेखित असणाऱ्या घटनेशी तंतोतंत मिळते.

नागपूर जवळच काही मैल अंतरावर असणाऱ्या वाकी येथे श्रीबाबा तेथील काशिनाथ पाटलांच्या आग्रहास्तव गेले. ती जागा त्यांना इतकी आवडली की एका आम्रवृक्षालाच त्यांनी " दवाखाना " हे टोपण नाव दिले. अद्यापही अनेक असाध्य रोग या वृक्षाच्या छायेत काही काळ राहिल्याने व तेथील थोड्या मातीच्या सेवनाने बरे होत असतात. या वर्तमानकाळातसुद्धा अनेक भक्त तिथे गोळा होतात.

अशा या महान संताने जवळ जवळ सहा महिने अगोदरच देहत्याग करण्याचा इशारा दिला होता. अनेक श्रेष्ठ तज्ञांद्वारे वैद्यकीय उपचारांनासुद्धा श्रीबाबांच्या या इशाऱ्यापुढे नमावे लागले. शेवटी १७ ऑगस्ट १९२५ रोजी सोमवारी श्रीबाबांनी देहत्याग केला.

त्यांची महासमाधी नागपूरच्या ताजाबाग शरीफला असून नेमलेल्या संस्थानद्वारे सर्व कार्य सुचारूपणे चालते. रघुजीनगर येथील त्यांच्या निवासस्थानी आणि वाकी शरीफलादेखील पूजाअर्चा व्यवस्थितपणे होते. या ठिकाणी नियमितपणे दरवर्षी उरूस वगैरेचा उत्सव मोठ्या उत्साहाने पार पाडण्यात येतो.

## श्री. भाऊसाहेब लोंबर यांचे निधन

पुणे येथील श्रीसद्‌गुरू साईनाथ कृपा मठ, स्वारगेट या मठाचे संस्थापक श्रीसाईभक्त भाऊसाहेब लोंबर हे लक्ष्मीपुजनाचे दिवशी मंगळवारी दिनांक ३१-१०-७८ रोजी सकाळी १० वाजून ४० मिनिटांनी श्रीसाईबाबांचे चरणी विलीन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्षांचे होते.

त्यांनी इसवी सन १९१९ साली शिरडीक्षेत्री श्रीसाईबाबांचे प्रथम दर्शन घेतले, व इ. स. १९७८ साली शेवटचे दर्शन घेतले.

# संत श्रीमेहेरबाबा



अवतार मेहेरबाबा ह्या युगाचे अवतार असल्याचे १) पुण्याच्या सद्गुरु हजरत बाबाजान २) केडगावचे नारायण महाराज ३) नागपूरचे ताजुद्दीनबाबा ४) साकोरीचे सद्गुरु उपासनीमहाराज आणि शिरडीचे सद्गुरु साईबाबा ह्या पंच सद्गुरूंनी घोषित केले नव्हे त्यांनीच ईश्वरास अवतार घ्याव-यास भाग पाडले. म्हणून मेहेरबाबा मानव रुपाने या धरतीवर अवतारीत झाले.

श्रीबाबांचे वडील कै. शेहरी आरजी ईराणी हे लहानपणापासूनच वृत्तीने विरक्त होते. संसाराबद्दल मुळी त्यांना आकर्षणच नव्हते. त्यांनी कफनी काठी आणि तुंबा या साधनांसह सतत १८ वर्षे सुफी दरवेशाप्रमाणे परमेश्वर शोधासाठी सारखे रानोवनी दऱ्याखोऱ्या-मधून आणि तिर्थक्षेत्री जाऊन भ्रमण केले. अशा भ्रमण अवस्थेत असतानाच एका झाडाखाली त्यांना झोप लागली त्यावेळी त्यांना स्वप्न पडले, आणि त्यातूनच आकाशवाणी झाली की :—

"तू उठ आणि जा ईश्वरी साक्षातकाराचे भाग्य तुला या जन्मात नाही. संसारातच आनंद घे तुझ्याच कुळात साक्षात परमेश्वर जन्म घेईल."

त्यानंतर ते इराण देश सोडून मुंबई येथे असणाऱ्या त्यांच्या बहिणीकडे आले त्यावेळी ते ३० वर्षाचे झालेले होते. आपल्या बंधूला आलेले पाहून बहिण हर्षवेडी झाली. डोक्याचे केस आणि दाढी खूप वाढली होती. अंगावरील कपडे लखलखीत संताचा वेष दर्शवित होती. बहिणीस वाटले, यापुढे तरी माझ्या बंधूने असे विरक्त न राहता संसाराचा योग्य लाभ घ्यावा म्हणून तिने आपल्या भावास लग्न करण्या-बाबत विनंती केली. प्रथम तर भाऊरायांनी हास्य करून बहिणीची गोष्ट वाऱ्यावरच उडविली कारण लग्न करून संसाररूपी जाळयात अडकण्याची मुळी त्यांची इच्छाच नव्हती. परंतु बहिणीच्या आग्रहास्तव म्हणून दारावरून जात असलेल्या एका सहा वर्षाच्या मुलीकडे बोट दाखवून "तू माझे लग्न करून देणार आहेस ना ग ? मग या मुलीशी लावून दे" अशी ही अशक्य बाब बंधूरायाने आपल्या बहिणीवर टाकली. त्यात भावाचा दृष्टीकोन असा की, ६ वर्षाची बालिका माझ्यासारख्या विरक्त

आणि ईश्वरावीण कशातही गोडी नसलेल्या मनुष्यास कोणीही देण्यास तयार होणार नाही आणि मी ईश्वरचिंतनाकरिता मोकळा राहीन. अशा प्रकारे बहिणीचे वचन पूर्ण करण्याकरिता भाऊ तयार झाला. परंतु ईश्वरी लीला अगाध आहे. त्याचे आज्ञेशिवाय ह्या जगातील झाडाचे पानसुद्धा हलू शकत नाही. इकडे बहिणीने, आपल्या बंधूचा होकार म्हणजे सरळ सरळ नकारच हे जाणून ही अवघड बाब पूर्णपणे घडवून आणण्याची जणू शपथच घेतली. आणि हळूहळू मुलीचे आईशी संबंध जोडून तेथून ३ वर्षांनी आपल्या भावाचे लग्न त्याच मुलीशी घडवून आणले.

असे हे विवाहबद्ध झालेले इराणी कुटुंब एकुलत्या एक बहिणीच्या सल्ल्यावरून पुण्यालाच स्थाईक झाले. तेथे त्यांना जमशेटजी, मेरवान, ( श्रीबाबा ) जाल, बेहेराम, आर्देशीर असे पाच पुत्र आणि मनी नावाची कन्या ( जी सध्या हयात असून जगातील ईश्वरप्रेरणेने एकत्रित झालेल्या सर्वांना ३१ जानेवारीला बाबांचे अमर-तिथीचे दिवशी ईश्वरी दर्शनाचा लाभ घडविते. ) अशी एकूण सहा अपत्ये झाली. त्यापैकी “ अवतार मेहेरबाबा ” हे त्यांचे दुसरे अपत्य होय. त्यांचा जन्म २५ फेब्रुवारी १८९४ मध्ये सकाळी ५ वाजता पुणे येथे झाला. अशा प्रकारे अवतारी पुरुषाचे आगमन या भारताचे पवित्र भूमीवर झाले.

१९१४ साली वयाच्या १९ व्या – २० व्या वर्षी पुण्याच्या डेक्कन कॉलेजात शिक्षण घेत असताना बाबांना पुण्याच्या एका वयोवृद्ध साध्वी योगिनीचा दर्शन लाभ झाला. त्या योगिनीच्या दर्शनामुळे बाबांच्या आध्यात्मिक उर्मीचा उदय झाला व त्यांनी विश्व-विद्यालयीन शिक्षणास रामराम ठोकला. त्या योगिनीच्या कृपाप्रसादाने बाबांना आत्मसाक्षात्कार झाला व ते आठ-नऊ महिने पूर्ण विदेही स्थितीत राहिले. बाबांच्या आयुष्याला महत्त्वाची कलाटणी देणाऱ्या या योगिनी म्हणजे श्री हजरत बाबाजान या मुसलमान संत स्त्री योगिनी होत. त्यांनी मेहेरबाबांच्या वडिलांना सल्ला दिला की मेहेरबाबांना विदेही अवस्थेत असतानाच शिरडी येथे भगवान श्रीसाई-बाबांच्या दर्शनास पाठवावे. त्याप्रमाणे बाबा श्रीसाईंच्या दर्शनास गेले असताना तिथे सद्गुरु श्रीसाईंनी त्यांना सांगितले, “ तुझे गुरू ब्राह्मण आहेत म्हणून मेहेर-बाबा शिरडीस पाच सहा महिने राहिले.” बाबांचा व त्यांचा हाच काय तो संबंध आला. १९२४ साली मेहेरबाबांनी नगरजवळ अरणगाव येथे मेहेराबाद कॉलनी नावाची वसाहत स्थापन केली. ता. १० जुलै १९२५ पासून त्यांनी मौन धारण केले. व ते दीर्घकालपर्यंत आचरणात आणले. मेहेरबाबांनी भारतभर जनसेवा व अध्यात्मिक कार्यासाठी भारतभर व परदेशातही दौरे केले. मेहेरबाबांचे आश्रम सर्वत्र असून त्यामधून जनसेवा व लोकोद्धाराचे कार्य सतत चालू आहे. श्रीसाईबाबांच्या काळात वावरणारे नगर जिल्ह्यातले हे श्रेष्ठ संत होत. ॐ

# श्रीबाबांनी दासगणू घडविले

—श्री. द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखलेरोड, ठाणे.



* श्रीदासगणू महाराज *

[पोलीस खाते म्हणजे रुक्ष वाळवंट. पण अशा खात्यात काव्याचे रोपटे रुजले हा एक चमत्कार! हे खाते बोलून चालून तामसीवृत्तीचे माहेरघर. अंतःकरणे दगडाची. या दगडातून राजस काव्याचा झरा झिरपू लागला हा दुसरा चमत्कार! पुढे या राजसकाव्याचे सात्वीक भक्तिकाव्यात रुपांतर झाले हा तिसरा चमत्कार, हे चमत्कार दासगणूंच्या आयुष्यात घडले. त्यांच्या जीवनात अनेक क्रांत्या झाल्या. प्रत्येक क्रांतीत आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठी त्यांचे जीवन वळण घेत गेले. त्यांच्या आयुष्यात अद्‌भूत रस निर्माण झाला तो चोर, दरोडेखोर, संतसंगती, श्रीसाईबाबांचा सहवास व पाठराखण यामुळे. संत दासगणूंच्या जीवनातील काही किस्से पुढे दिले आहेत.]

* दासगणूंचा जन्म आजोळी झाला. त्यांचे पाळण्यातील नाव नारायण. त्यांची आई मुलाला घेऊन पतिगृही आली तेव्हा आजोबांनी मुलाला मांडीवर घेतले व म्हटले, " अरे, नारायण काय नाव ठेवले ? याचे पोट पहा कसे गणपतिसारखे आहे. कान किती मोठे आहेत. याला गणपति म्हणा. " झालं. नारायणाचा गणपति झाला. गणेश झाला. गणेशाचा गणू झाला. गणूचा गणू जमादार झाला व शेवटी संत दासगणू झाला. महाराजांच्या भावी आयुष्यातील क्रांत्यांचा हा नावाचा पहिला टप्पा व नाव-लौकिक हा अखेरचा टप्पा. नराचा नारायण होतो पण दासगणू नारायणाचे नर ( अर्जुन ) झाले. ढोंगी भक्तीवर ते अचूक शरसंधान करीत.

नोकरीधंदा न करता चकाट्या पिटीत गावात भटकण्याच्या त्यांच्या सवयीमुळे घरातील मंडळी त्यांच्यावर रुष्ट असत. एकदा त्यांची चुलती त्यांना म्हणाली, " डौल दाखवू नकोस, गणपति. शेवटी आमच्या नावावर तुला विकावे लागेल. मी अमक्याचा पुतण्या आहे याच पतीवर तोंड वेंगाडून तुला पोट भरावे लागेल. " दासगणूंचा स्वाभिमान खवळून उठला व म्हणाला, " या घरात आता पाणी पिण्यासही मी राहणार नाही, उपाशी मेलो तरी तुमचे नाव कधीच सांगणार नाही, जे मिळवीन ते माझ्या एकट्याच्या नावावर. " पुन्हा म्हणून दासगणू त्या घरी परत गेले नाहीत.

पुढे नगरच्या रस्त्यावरून भटकत असता त्यावेळच्या पोलीस सुपरिंटेंडेटने त्यांना पाहिले. ते गणूला साधारण ओळखत होते. त्यांनी गणूची विचारपूस केली. गणूची उंची, शरीरयष्टी व सुसंस्कृत घराणे लक्षात घेऊन त्यांनी गणूला पोलीस-खात्यात नोकरी दिली. महिना ९ रु. पगार मिळे. दासगणू पोलीसखात्यात ११ वर्षे होते. पुढे साईबाबांनी त्यांच्या जीवीत कार्याच्या पूर्तीसाठी ती नोकरी सोडावयास लावली.

दासगणूंचे गुरु श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकर हे होत. हे अक्कलकोट स्वामींच्या परंपरेतील सांप्रदायिक रामदासी होते. (शिर्डीचे गुरुस्थान सांगते की अक्कलकोट व शिर्डी एकच). इहलोक सोडताना वामनशास्त्री दासगणूला म्हणाले, " अरे, शोक, दुःख कशाला करतोस ? आपण मृत्युलोकात आहोत. असे चालायचेच. तू दोन तीनदा शिर्डीस गेला होतास. साईबाबा योग्य विभूती आहेत. त्यांना माझे स्वरूप मान. आम्ही एकरूप आहोत. तेच तुला मार्ग दाखवतील. " आपल्या गुरुचा आदेश दासगणूंनी पूर्णपणे पाळला. त्यांनी बाबांना विनंती केली की —

माझे गुरु मरून गेले । पोरकेपण मजला आले ।
म्हणून पाहिजे सांभाळिले । या पोरक्या गणूसी ।

तुम्ही एकरूप अवघे संत । तुम्हामाजी नसे द्वैत ।
तुम्ही वामनशास्त्री साक्षात । आहांत बाबा मजलागी ।

नारदाच्या गादीला शोभण्यासारखी विरागी वेषभूषा किर्तनासाठी बाबांनी दासगणूना दिली होती. दासगणूंचे बोलणे निर्भिड, स्पष्ट, जे मनात तेच बाहेर. छपवा-छपवी नाही, रसाळ व भक्तिभावाने संतांची केलेली निरपेक्ष सेवा, निस्पृहता. किर्तनाला ते कवडीचेही मोल घेत नसत पण किर्तन मात्र लाखमोलाचे असे. स्थिरता, निस्पृहपणा, वैराग्य ही परमार्थाची मुख्य लक्षणे. यांची बीजे त्यांच्या पूर्वचरित्रात दिसून येतात व उत्तर चरित्रात पूर्णत्व दिसून येते. बाबांनी दिलेली वेषभूषा दासगणूंनी अखेरपर्यंत कायम राखली. अगदी उतार वयात कडाक्याच्या थंडीत ते फक्त अंगावर शाल घेत.

किर्तनरुपाने साईबाबांचा परिचय आबालवृद्धांना करून देणारे पहिले संतकवि दासगणू होत. आज घराघरातून साईबाबांच्या भक्तीची जी ज्योत तेवत आहे व घरोघरच नव्हे तर लॉरी, मोटारी, दुकाने, हॉटेले यातून साईबाबांच्या प्रतिमा दिसत आहेत त्या सर्वांची मुहूर्तमेढ रोवली ती संत दासगणूंनी. तमाशा डफ फोडला व भक्तीचा डफ घेऊन गावोगावी प्रचार केला तो दासगणूने. या मागे साईबाबांचा हात होता हे उघड.

दासगणू हे रामाचे उपासक आहेत हे लक्षात घेऊन श्रीसाईबाबांनी रामनवमी उत्सव दासगणूंकडे सोपविला. त्याप्रमाणे दरवर्षी शिर्डीस जाऊन दासगणू हा उत्सव करीत. एका वर्षी काही कारणावरून संस्थान व दासगणू यांच्यात बेबनाव होऊन तुम्ही शिर्डीसही येऊ नका असं काही सभासदांनी त्यांना सांगितले. परंतु बाबांची आज्ञा वंद्य मानणाऱ्या दासगणूंनी त्यावर्षी शिर्डीपासून एक मैलावर असलेल्या बोरावक्यांच्या वस्तीत जाऊन रामनवमी उत्सव साजरा केला.

शके १८४७ मध्ये सवाई तुकोजीराव होळकर यांच्या यशवंत निवास राजवाड्यात संतदासगणूंची एक महिना किर्तने झाली. समाप्तीच्या दिवशी बिदागी म्हणून सोन्याच्या थाळीत सोन्याच्या मोहरा व चांदीच्या ताटात चांदीचे रुपये भरून त्यांच्यापुढे ठेवण्यात आले. किर्तनासाठी कवडीचीही बिदागी घ्यायची नाही असे दासगणूंचे व्रत होते. बिदागी नाकारली तर श्रीमंतांचा अपमान होईल. स्विकारली तर व्रताचा भंग होईल. असा हा पेच. समाप्तीचे भाषण करताना दासगणू म्हणाले, “शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति देण्यात श्रीमंत उदार आहेत. ते शिष्यवृत्तीची याचना कधीही नाकारीत नाहीत असा श्रीमंतांचा लौकीक आहे. मी परमार्थ कॉलेजात प्रवेश चहातो आहे. या कॉलेजात निर्लोभतेची शिष्यवृत्ति लागते. ती श्रीमंतांनी मला देऊन आपला नावलौकीक राखावा हीच माझी श्रीमंतांकडे नम्र मागणी आहे.”

झाले. थाळी ताट परत गेले, श्रीमंत हेलावले. कनकाचा लोभ न धरता अत्यंत सौजन्याने निगर्वीपणाने लक्ष्मीला नकार देण्याचे हे अद्वितीय उदाहरण दासगणूंचे अंतरंग उघड करते.

ईशावास्याचे मराठी पद्य-रूपांतर करताना त्येन त्यक्तेन भुंजीतः याचा अर्थ दासगणूंना उलगडेना. याबद्दल बाबांना विचारता, 'पार्ल्याला जा. काकांची मोलकरीण सर्व उलगडा करील' असे बाबा म्हणाले. गणूची बाबांवर निष्ठा असल्यामुळे ते पार्ल्याला गेले. एका पहाटे मोलकरणीच्या वर्तणुकीतून बाबांनी त्येन त्यक्तेन भुंजीतःचा गुह्य अर्थ उकलून दाखवला. अभेद भक्तीचे एकात्मतेचे दासगणूंच्या ठिकाणी असलेले मूळ बीज वाढीस लागले. पुढे नेवाशाला मोहिनीराजासमोर शेवटचा तमाशा करून त्या राजाच्या साक्षीने गणूने आपला तमाशा डफ फोडून टाकला. त्यांच्या काव्य गंगेला वळण मिळून ती भक्तिमार्गावरून झुळझुळ वाहू लागली.

गणूंनी एक नाटकही लिहिले. त्याचे नाव "मंजुरवा". ते चांगले असल्यामुळे कंपनीला द्यावे असा गणूच्या मित्रांनी आग्रह केल्यामुळे नाटक कोल्हापूरच्या एका कंपनीकडे पाठविण्यात आले. परंतु व्यवस्थापकाने ते न वाचताच जी संभावना केली, जो उपमर्द केला तो मानी गणूस फारच बोचला. नाटकाची हस्तलिखित प्रत त्यांनी जाळून टाकली. एका चांगल्या नाटकास मराठी रंगभूमी मुकली. यापूर्वी त्यांच्या मित्रानी या नाटकाचा केलेला प्रयोगही अनेक अडचणींमुळे दासगणूंना पहावयास मिळाला नाही. आपले पुत्ररत्न आपणास पहावयास मिळू नये हे दुर्दैवच म्हणायचे. पण भाषेचे ते सुदैव ठरले, नाहीतर तमाशा सुटला व नाटकात रंगला असे होऊन मराठी भाषेचा हा आधुनिक महिपति, महिपति न होता गणू जमादारच राहिला असता.

दासगणूवर साईबाबांचे फार प्रेम होते. बाबा क्रोधावस्थेत असता त्यांच्यापुढे जाण्यास कोणीही धजत नसे. पण अशावेळीही दासगणू बाबांशी गप्पा मारीत, दासगणूंना श्रीबाबांबद्दल अति आदर वाटे. या पोलिसाचं खरे जीवीतकार्य कशात आहे हे बाबा जाणत होते. नोकरी सोडून देण्यास बाबा गणूला सारखे सांगत. गणूचे धैर्य व निर्भिडवृत्ती इतकी की ते या बाबतीत बाबांशी वाद करीत. नोकरीच्या बाबतीत गणूने अनेकवेळा बाबांचा अवमान केला, वचने मोडली. तरीही तो शांतिब्रह्म शिर्डीचा राजा गणूंवर कधीही रागावला नाही. उलट बाबांच्या नोकरी सोडण्याच्या ससेमिऱ्याला कंटाळून गणू शिर्डीस जाण्याचे टाळू लागला. एकदा सरकारी कामासाठी गणूला शिर्डीच्या बाजूस जावयाचे होते. पण शिर्डी टाळण्यासाठी ते आडवाटेने जाऊ लागले. परंतु तेथेही बाबांनी गणूला गाठले. बाबा म्हणाले, "गणू, किती तोंड चुकवशील? नोकरी सोडून दे. ऐक. नाहीतर पस्तावात पडशील." गणू नमस्कार करून पुढे सटकला.

बाबांच्या सांगण्यावरून संतचरित्रासाठी माहिती मिळविण्यासाठी दासगणू रजा न घेताच अकोटला गेले. याच वेळी त्यांच्या हद्दीत मोठा दरोडा पडून एक खूनही झाला. दासगणूवर मोठे वॉरंट आले. त्यातून सुटका होणे शक्य नव्हते. बाबांची अवज्ञा केल्यामुळेच हे संकट आले असे वाटून नोकरी सोडण्याचा गणूने निश्चय केला. गोदावरीत शिर्डीकडे तोंड करून ते उभे राहिले व ओंजळीत पाणी घेऊन म्हणाले, "बाबा या संकटातून तुम्ही मला मुक्त केले तर तुमच्या आज्ञे-प्रमाणे मी नोकरी सोडून देईन. याला साक्ष ही गंगामाई." असे म्हणून त्यांनी पाणी सोडले. पुढे या संकटातून दासगणू मुक्त झाले. एवढेच नव्हे तर मुद्देमालासह दरोडे-खोरांना पकडून दिल्याबद्दल त्यांना बढती मिळाली. ही बाबांची लीला पहा. गणूला संकटमुक्त केले. पण बढतीचा मध तोंडाला लावला का? तर गणूची मनोभूमिका किती दृढ झाली आहे याची परिक्षा पहाण्यासाठी, गणू परिक्षेत नापास झाले. बढतीच्या आशेने त्यांनी नोकरी सोडली नाही. पुढे ते शिर्डीस गेले असता बाबांनी त्याना हटकले, "गणू, गंगेत शपथ कोणी वाहिली नोकरी सोडीन म्हणून? अजून तरी डोळे उघड." पण गणूने आज्ञा मानली नाही.

काही दिवसांनी गणू कायद्याच्या कचाटीत सापडले. चारित्र्याला धक्का बसून शिक्षा होण्याचा प्रसंग आला. आता मात्र गणूचे डोळे उघडले. ते शिर्डीला आले व बाबांच्या चरणांना वंदन करून म्हणाले, "मागील खेपेस माझी चूक होती तरी तुम्ही मला वाचविलेत. या खेपेस मी निर्दोषी आहे हे तुम्ही जाणता. तरी मला शिक्षा देवविणार काय? तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतो की मी यातून पूर्ण निर्दोषी ठरून सुटलो तर नोकरी सोडून देईन." पुढे दासगणू पूर्ण निर्दोषी सुटले. त्यानंतर मात्र त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व एका गुलामगिरीतून मोकळे झाले. निष्ठा आणि सबुरी या आपल्या महामंत्राचा उपयोग यश कसे मिळवून देतो याचे प्रात्यक्षिक नोकरी प्रकरणात बाबांनी स्वतःच्या आचरणाने दाखविले आहे. चमत्कार व लीला यांचे आदराने कौतुक करावे. त्याने निष्ठा वाढीस लागेल. पण परमार्थाच्या पायऱ्या चढता येणार नाहीत. यासाठी अध्यात्म आपल्या रोजच्या आचरणात उतरला पाहिजे असेच जणू बाबा या प्रकरणात सांगताहेत असे वाटते.

नोकरी सोडून गणू शिर्डीस आले. पण पुढे काय याची त्यांना काळजी होती. बाबा म्हणाले, "गणू, काळजी कसली करतोस? जालना कडील नांदेडास जा, मी तुझी सगळी व्यवस्था करून ठेवली आहे.

आज्ञेप्रमाणे दासगणू नांदेडला गेले. तेथे त्यांची काव्यप्रतिभा उत्तरोत्तर इतकी फुलत गेली की पुढे तिच्या सुगंधाने उभा महाराष्ट्र दरवळला व आधुनिक महिपति ही पदवी रसिकांनी त्यांना बहाल केली. नारायणाचा गणपति, गणपतीचा गणेश, गणेशाचा गणू जमादार व जमादाराचा आधुनिक महिपति असे क्रांतिकारी जीवन जगलेले हे संत दासगणू, त्यांना आमचे आदरपूर्वक प्रणाम. ★

# श्रीसाईबाबांचे गुरुबंधू श्री टेंब्येस्वामी



श्री टेंब्येस्वामी

● रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी शहरापासून नऊ मैलावर असलेल्या माणगाव येथे इ. स. १८५४ मध्ये यांचा जन्म एका सत्वशील ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील गणेशपंत हे लहानपणापासूनच विरक्त वृत्तीचे. अपस्माराच्या त्यांना विकार होता. नित्य देवधर्मातच ते गर्क असत. पुढे दत्त सेवेसाठी ते १२ वर्षे गाणगापूरला जाऊन राहिले. बारा वर्षानंतर श्रीदत्तमहाराजांनी त्यांना पुन्हा कोकणात जाण्याची आज्ञा केली. त्या आज्ञेनुसार ते घरी परतल्यावर काही दिवसातच तीन कन्यांच्या पाठीवर त्यांना पुत्र झाला त्याचे नाव आजोबांनी–हरिभट्ट–वासुदेव ठेवले.

वासुदेवांच्या आईचे नाव रमाबाई. त्या व्यवहारकुशल, परमसाध्वी होत्या. वासुदेवांच्या जन्माचे वेळी त्यांना अनेक दिव्य स्वप्ने पडली त्यामुळे कुणी अवतारी पुरुष आपल्या पोटी येणार याची त्यांना कल्पना होती.

वासुदेवानंद लहानपणापासूनच अत्यंत तेजस्वी दिसत. तात्याभट्ट उकिडवे यांनी त्यांचे जवळची सारी विद्या वासुदेवांना दिली. शंभुशास्त्री साधले यांचेकडे संस्कृत काव्य व ज्योतिषशास्त्राचे त्यांनी अध्ययन केले. पुढे त्यांचा विवाह वयाच्या

२१ व्या वर्षी इच्छेविरुद्ध झाला. त्यामुळे मनःशांतीसाठी ते श्रीनरसोबावाडीस आले. तिथे श्री गोविंदस्वामींसारखया अलौकीक सिद्धपुरुषाचा सहवास त्यांना लाभला. गुरु चरित्राची पारायणे त्यांनी केली यामुळे साक्षात् दत्त त्यांना प्रसन्न होऊन ते माणगावी सात वर्षे राहिले. वासुदेवांना तेव्हापासून 'वासुदेवानंद सरस्वती' असे लोक संबोधू लागले. सावंतवाडीकरांनी त्यांना राजवाड्यातले निमंत्रण दिले. पण तिथे त्यांनी पाऊलही ठेवले नाही.

श्रीमहाराजांनी आमरण पायी संचार केला व हजारो दुःखार्तांना दुःखमुक्त केले व शाश्वत सुखाच्या स्वधर्ममार्गी लावले. श्रीसाईबाबांचे व त्यांचे आंतरिक बोलणे-चालणे होते. त्याबद्दलच्या अनेक कथा आहेत. संन्यासधर्माचा लोपलेला आदर्श त्यांनी भारतात पुन्हा प्रस्थापित केला. स्वामीजी १९१३ साली नर्मदातीरावरील गरुडेश्वरी अनंतात विलीन झाले.

*

## शिरडीस येणाऱ्या साईभक्तांसाठी

### भक्तांना अवघे दोनच दिवस जागा मिळेल

श्रीसाईबाबांचे संस्थान शिरडीमध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या भक्त-मंडळींनी संस्थानच्या खोल्या रहाण्यासाठी घेतल्या व ते तिथे त्या जागेत अधिक दिवस जर राहिले तर मागाहून तिथे येणाऱ्या साईभक्तांना संस्थानच्या कक्षेतील खोल्या राहण्यासाठी उपलब्धच होऊ शकत नाहीत ही अडचण ध्यानी घेऊन जास्तीत जास्त साईभक्तांना शिरडीस राहून दर्शन, अभिषेक, धर्मोपासना इ. करण्याची संधि मिळावी यासाठीं भक्तांना यापुढे खोल्यांमधून फक्त दोनच दिवस रहाण्याची परवानगी देण्याचा नियम केला आहे. तरी शिर्डीस यापुढे येणाऱ्या साईभक्तांनी याची नोंद घेऊन संस्थानशी सर्व प्रकारचे सहकार्य करावे अशी विनंती श्री. क. ही. काकरे, कोर्ट रिसीव्हर, श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी हे करतात.

# ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज



श्री गोंदवलेकर महाराज

* सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील गोंदवले या छोट्या गावी श्रीमहाराजांचा जन्म इ. स. १८४४ साली एका पुण्यशील वारकरी कुळात झाला. त्यांच्या आजोबाचे नाव लिंगोपंत कुलकर्णी, आजीचे नाव रखुमाई. विठ्ठलभक्ती या दोघांचेकडे होती. महाराजांच्या वडिलांचे नाव रावजीपंत व आईचे गीताबाई. या दोघांचेकडे रामभक्ती होती. या दोन्ही दैवतांच्या भक्तीचा वारसा श्रींना मिळाला. भगवद् भक्तीची ओढ श्रींना अगदी बालपणापासून. वयाच्या ६ व्या वर्षी एका मध्यरात्री ते नदीकाठच्या गुहेत रामनामाचा जप करताना सापडले. वयाच्या ९ व्या वर्षी गुरुशोधासाठी त्यांनी कोल्हापूर गाठले व १२ व्या वर्षी गुरुशोधाच्या तळमळीने ते उत्तर भारत फिरले. पण गुरुभेट झाली नाही म्हणून ते निराश झाले.

पुढे दक्षिणेकडे गोदातीरावर ते बसले असताना समर्थ संप्रदायातील श्रीरामकृष्ण हे थोर सत्पुरुष त्यांना भेटले व त्यांनी येहळे गावी तुकाराम चैतन्याकडे जाण्याचा महाराजांना सल्ला दिला व तेच त्यांचे गुरु असल्याचे सांगितले. तुकाराम चैतन्यांनी महाराजांची अक्षरशः कसोटी घेतली त्या सर्व कसोट्यांना ते उतरले त्यामुळे त्यांचे सामर्थ्य वाढले. अनेक सिद्धी श्रीमहाराजांच्या चरणी लोळण घेऊ लागल्या व योगाभ्यासातील अनेक कूट समस्या त्यांना करतलमलवत झाल्या. अनेक शिष्य त्यांना लाभले. "दख्खनका साधू' असे लोक त्यांना अत्यादराने संबोधू लागले.

गोंदवलेकर महाराजांनी सर्वांना सर्व रोग, चिंता, समस्या यावर एकच औषधी सांगितली व ती म्हणजे भगवंताचे नाम.

श्रीमहाराजांनी भारताचा तीनदा प्रवास केला. दहादा काशीयात्रा केली. त्यांच्या पत्नीचे नाव सरस्वती. गोंदवल्यास त्यांनी राममंदिर बांधून मूर्तीची स्थापना केली. लो. टिळक, साहित्यसम्राट न. चिं. केळकर, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके इ. मंडळी महाराजांना फार मानीत. नाम व अन्नदान या दोन गोष्टी श्रीमहाराजांनी आपल्या भक्तांना आजन्म सांगितल्या. त्यामुळे गोंदवले ही नामभूमी झाली आहे. श्री गोंदवलेकर महाराज हे श्रीसाईबाबांच्या काळातले एक थोर संत म्हणून ओळखले जात होते. ४४

## परमपूज्य श्रीगोदावरी माताजींचा शुभ संदेश

माणसा-माणसातील भेदभाव नाहीसा करून अखिल मानवजमातीत विश्वबंधुत्वाचे आणि प्रेमाचे नाते निर्माण करण्याचे महत् कार्य करण्यासाठी श्रीसाईबाबांचा अवतार झाला. प्रेम, दया, सहानुभूती आणि परोपकार ही त्यांच्या शिकवणुकीची मुख्य सूत्रे होत.

श्रीसाईबाबांसंबंधी 'विशेषांक' प्रसिद्ध करून त्यांच्या विभूतीमत्वाची सर्वसामान्य जनतेस माहिती करून देऊन त्यांना भक्तीमार्गाचे वळण लावण्याचे कार्य आपण निरलसपणे आणि जिव्हाळयाने चालविले आहे, ते अत्यंत स्तुत्य आणि अभिनंदनीय आहे. आपल्या कार्यास श्रीसाईबाबांचे शुभ आशीर्वाद !

—श्रीगोदावरीमाताजी,
श्रीउपासनी क. कु. स्थान, साकुरी,
पोस्ट-राहाता, जि.-अहमदनगर

## जाहिर निमंत्रण

श्री. का. सी. पाठकसाहेब माजी न्यायालयधारक श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांचा सत्कार समारंभ रविवार दि. ७ जानेवारी १९७९ रोजी सायंकाळी ४ वाजता डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर, इंदिरा निवास, लालबहादूरशास्त्री मार्ग, कुर्ला, मुंबई ४०००७० या ठिकाणी होणार आहे. साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून समारंभास शोभा आणावी अशी विनंती डॉ. गव्हाणकर करतात.

# संत श्रीमाणिकप्रभू महाराज

* श्रीमाणिकप्रभू हे दत्ताचा अवतार होते अशी सर्वत्र समजूत आहे. बालपणापासून तो समाधी कालापर्यंत त्यांनी कितीतरी चमत्कार केले व त्याबरोबरच जनजागृतीपण केली. आपल्या असंख्य भक्तांचे मनोरथ त्यांनी पुरविले, आणि मग आपला अवतार संपवला. त्यांच्या एकंदर कार्यामुळेच ते अवतारी पुरुष होऊन गेले.

श्रीमाणिकप्रभूंचा जन्म मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थी शके १७३९ यादिवशी लाडवंती या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मनोहरपंत हरकुडे व आईचे नाव बायम्मा माणिक हे मनोहरपंताचे दुसरे अपत्य. त्यांच्या पहिल्या अपत्याचे नाव हनुमान. त्यांना हनुमंताचा अवतार असे समजतात. हा मुलगा मुंज होईतोपर्यंत काही एक बोलला नाहीं. यांनाच पुढे लोक हनुमानदादा उर्फ दादामहाराज म्हणू लागले. मनोहरपंतांच्या तिसऱ्या मुलाचे नाव नृसिंह. तिन्ही मुलांच्या जन्मानंतर मनोहरपंतांनी इहलोकीची यात्रा संपविली. यामुळे या तिन्ही मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांची माता बायम्मा यांचेवर येऊन पडली.

लहानपणीच प्रभूंनी अनेक चमत्कार करून दाखविले. आपल्या गोविंदा नामक एका मृत झालेल्या मित्राला त्यांनी जिवंत केले. मुले न होणाऱ्या एका आंबेवालीस भरपूर अपत्यसंपदा दिली. मेलेल्या पोपटाला हवेत फेकून देऊन त्याला त्यांनी पुन्हा प्राण दिला. प्रभू कित्येकदा वेड्याप्रमाणे वागत त्यामुळे लोक त्यांना वेडाप्रभू म्हणत प्रभूंच्या मामांनी त्यांना जकातनाक्यावर नोकरीस लावले खरे पण नाक्यावर जो पैसा गोळा होई तो सरकारी खजिन्यात न जाता गोरगरीबांना वाटण्यात येऊ लागला. मामा या गोष्टीला कंटाळले व एकदा रागावून बोलले. त्यासरशी प्रभू एका लंगोटीनिशी घराबाहेर पडले; व कल्याणपासून तीन मैलावर मंठाळ गावाजवळ अमृतकुंड नावाचे एका तीर्थाजवळ ध्यानस्थ बसले. त्यावेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते. या काळातही प्रभूंनी दिव्य चमत्कार करून दाखविले.

पुढे हुमणाबादजवळ एका नव्याच वसाहतीची त्यांनी स्थापना केली. त्यास 'माणिकनगर' असे म्हणतात. प्रभू मोठे दत्तावतारी सत्पुरुष होऊन गेले. त्यांचा स्वभाव शांत, गंभीर, विचारी व दयाळू होता. ते गायनात निष्णात होते. अक्कलकोट स्वामी व प्रभू हे समकालीन. त्यांचे एकमेकाशी मैत्रीचे संबंध. एकदा स्वामी माणिक नगरात प्रभूंच्या भेटीस गेले होते. त्यांचा व प्रभूंचा तीन दिवस एकांत झाला. त्यात त्या उभयतांचे काय काय बोलणे झाले याचा कुणालाच थांगपत्ता लागला नाही. श्रीमाणिक प्रभूंनी जनजागृतीचे आदर्श कार्य केले.

मार्गशीर्ष शुद्ध दशमी शके १७८७ यादिवशी आपल्या भक्तांच्या समोरून ते कायमचे अदृश्य झाले. त्यांनी समाधी घेतली. प्रभूंनी 'माणिक प्रभाकर' हा संस्कृत ग्रंथ लिहिला.

# ★ श्रीसाईबाबा आणि श्रीम्हाळसापती ★

—सौ. उषा प्रभाकर अधिकारी,

सावित्री भुवन, बंदररोड, रत्नागिरी

● कपाळावर, दोन्ही दंडावर भस्माचे पट्टे असलेले, शेंडीला गाठ मारलेले, मध्यम वयाचे, निग्रही, तपस्वी असे एक सद्‌गृहस्थ खंडोबाच्या देवळात व्यग्र मनाने बसून होते. सद्‌गुरूंच्या शोधार्थ भटकून, संसाराकडे दुर्लक्ष करून, वणवण करून सद्‌गुरू भेटले असताही त्यांना त्यांनी ओळखले नाही. देविदासबाबांनी सद्‌गुरूंची ओळख सांगताच आपले सुखनिधान दारी आले असता आपल्या करंट्या नशिबामुळे आपले हातून ते आपण हिरावले याची त्या गृहस्थांना खंत वाटली. डोळे भरभरून येत होते. आपले सद्‌गुरू ते निंबाखाली प्रकटलेले बालसाधु परत येतील का या आशंकेने मन कासावीस होत होते. तोच देवळाजवळ काही बरीचशी मंडळी आलेली त्या गृहस्थांना दिसली. एका लग्नाचे वऱ्हाड होते ते! त्याच वऱ्हाडातून त्या गृहस्थांचे परमदैवत पुन्हा परतले होते पण याची दाद त्या गृहस्थांना नव्हती. वऱ्हाडातील लोकांची सोय गैरसोय पाहून ते देवळाकडे वळतायत तोच एका तरुण, सुंदर उंच देखण्या व्यक्तीकडे त्यांचे लक्ष गेले, आणि आपण काय करतोय हे लक्षात येण्यापूर्वीच ते धावत त्या तरुण साधूकडे गेले आणि म्हणाले, " आवो मेरे प्यारे साई " एवढेच म्हणून न थांबता त्यांनी त्या तरुणाला प्रेमाने दृढ आलिंगन दिले. आपले डबडबलेले डोळे न पुसताच ते म्हणाले, " साईजी, आता कृपा करून या लेकराला सोडून पुन्हा जाऊ नका. गेली ३ वर्षे मी आपणाला शोधत होतो. मला असे पोरके करून आपण कुठे गेला होतात? मी आपणाला यापुढे कुठेही जाऊ देणार नाही." तरुण साधूने आपल्या अमृतमय, स्नेहाळ दृष्टीने त्या गृहस्थांकडे पाहून आपला अभयहस्त त्यांचे मस्तकावर ठेवला त्या करस्पर्शाने त्या मध्यम वयीन गृहस्थांची, श्रेष्ठ भक्त म्हाळसापतींची काया पुलकित झाली. दोघानाही एकमेकांच्या अंतःकरणाची ओळख पटली.

म्हाळसापतींच्या वयाच्या मानाने लहान असणारे त्यांचे सद्‌गुरू म्हणजे आपले सर्वांचे श्रीबाबा. ते शिरडीत २/३ दिवस राहिले व पुन्हा राहात्यास गेले. म्हाळसापती परत दुःखी कष्टी झाले. पण बाबा परत आले आणि म्हाळसापतींना फुलझाडांची रोपटी बाग करण्यासाठी दिली. म्हाळसापतींनी ती आनंदाने मान्य केली. सद्‌गुरुने आज्ञा करावी व आपण ती पाळावी. प्रत्यक्ष खंडोबाच आपल्या नशिबाने आपल्यात वावरत आहे. या दृष्टीने बाबांकडे पहावे. सदा निजानंदात

असावे. वाटेत भेटेल त्याला बुक्का लावावा. जननिंदेकडे दुर्लक्ष करावे; कुटुंबवत्सल असूनही विरक्तीने रहावे असा म्हाळसापतींचा दिनक्रम होता. पडक्या मशिदीत बाबा एकटेच झोपतात या विचाराने त्यांच्या जिवाला हळहळ वाटे. रात्ररात्र झोप नसे. त्यांच्या मनीची तळमळ बाबांनी जाणून त्यांना मशिदीत झोपावयाची परवानगी दिली. कुटुंबाचा रोष पत्करून मोठ्या आनंदित मनाने म्हाळसापती बाबांबरोबर मशिदीत झोपू लागले. एक हस्त बाबांच्या छातीवर ठेऊन अहोरात्र सद्गुरु सेवा हातून घडावी म्हणून जागू लागले. बाबा म्हणतील तो शब्द प्रमाण मानून आनंदाने राहू लागले. शिरडीतील अन्य संतसाधू जानकीदास, देवीदास, गंगागीर, आनंदनाथ यांची त्यांनी बाबांशी भेट घडवून आणली. या संत मंडळीत म्हाळसापती ब्रह्मानंदाचा उपभोग घेऊ लागले.

हळूहळू शिरडीला क्षेत्राचे महत्त्व येऊ लागले. जीर्ण मशीद उभे राहण्यासाठी अपुरी पडू लागली. लोकांनी तिचा जीर्णोद्धार करावयाचे ठरविले. परंतु बाबा परवानगी देतील का या आशंकेने कोणी पुढे यावयास तयार होईल. अशावेळी म्हाळसापतींनी मोठ्या मिनतवारीने ती मिळविली. मशीद दुरुस्त झाली. भक्तमंडळी बाबांची मशिदीतून चावडीपर्यंत मिरवणूक काढू लागली. यावेळी बाबांचा उजवा शुभहस्त हातात धरून देण्याचे भाग्य म्हाळसापतींना लाभले. इतकेच नव्हे तर बाबांची पूजा करण्याचा मानही म्हाळसापतींनाच मिळाला.

म्हाळसापती परिस्थितीने गांजलेले. कशीबशी हातातोंडाशी गाठ पडे पण वृत्ती अगदी निःस्पृह. त्यांनी बाबांजवळ अवाक्षरानेही कधी उच्चार केला नाही की पसा पसरला नाही. एका भक्ताने त्यांची ही परिस्थिती पाहून त्यांना काही रक्कम देण्याचे ठरविले तेव्हा बाबा पटकन म्हणाले, "माझ्या म्हाळसापतीला या ऐहिक वैभवाची मुळीच गरज नाही. त्याला हवे आहे ते वैभव कधीच मिळाले आहे. तो आपल्या स्थितीत आनंदात आहे. खोट्या वैभवाला भुलणारा माझा म्हाळसापती नव्हे बरे!" एका श्रेष्ठ, विरागी, त्यागी, तपस्वी, निःस्पृह, परमभक्त, परमप्रिय अशा म्हाळसापतींविषयी बाबांचे हे किती विश्वासाचे बोल! त्या विश्वासावरच बाबांनी एक विलक्षण गोष्ट घडवून आणली. दम्याच्या व्याधीने सहनशीलता संपुष्टात आली असे वाटल्यावरून बाबांनी आपला आत्मा ब्रह्मांडी नेऊन ठेवण्याचा ३ दिवसांचा संकल्प केला. अशावेळी ते म्हाळसापतींना म्हणाले, "प्रिय भक्ता, मी ३ दिवस माझा आत्मा ब्रह्मांडी नेऊन ठेवत आहे. दक्षिण बाजूच्या उजव्या कोपऱ्यात समाधी खणून बाहेर २ लाल निशाणे लावून माझा देह तेथे ठेऊन रक्षण करा. मज उठविण्याचे मनातही आणू नका. लाल निशाणे लावल्याने कोणीही तिकडे फिरकणार नाही. कबूल आहे ना?" "होय देवा" असे म्हणून म्हाळसापतींनी कबुली

दिली. त्याक्षणी बाबांचा देह अचेतन होऊन म्हाळसापतींच्या मांडीवर पडला. त्यांनीही तो ३ दिवस प्राणपणाने रक्षण केला. बाबांची अवस्था लोकांनी पहाताच अंत्यसंस्कार करण्यासाठी हिंदू मुस्लीम दोन्ही जमातीचे लोक जमले. अशावेळी म्हाळसापतींनी त्याना विनवून ७२ तास वाट पहा असे सांगितले. म्हाळसापतींचे वैराग्य, त्यांची दृढ निष्ठा आणि मनाचा निश्चय पाहून लोकांनी त्याला मान्यता दिली. अखेर ७२ तासानंतर बाबा पुन्हा देहावर आले. म्हाळसापतींना आनंदीआनंद झाला. मूठभर लोकांच्या आग्रहाला बळी पडून आपण त्यांचे ऐकले असते तर जन्मोजन्मी गुरुहत्येचे पातक डोक्यावर बसले असते. परंतु बाबांनीच त्यातून सोडविले. आपल्या श्रेष्ठ भक्ताची बाबांनी एकप्रकारे परीक्षाच घेऊन आपल्या भक्तमालिकेत त्यांना उच्चस्थानी नेऊन बसविले.

दिवसेदिवस बाबांची कीर्ती दशदिशात दुमदुमू लागली. लोक दुरदुरून येऊ लागले. त्यांची सेवा म्हणजे बाबांची सेवा या भावनेने त्यांच्या सरबराईत म्हाळसापती वाकू लागले. सदा चेहऱ्यावर हास्य, आदरभाव. त्यामुळे पहाणाराचे मनही संतुष्ट होई. म्हाळसापती अनेक भक्तांचे अनुभव सांगत. स्वतःचे सांगत. मक्के-मदिनेची यात्रा करून आलेल्या हाजला, खाशाबा देशमुखाची वृद्ध आई जी गुरुमंत्रासाठी ३ दिवस उपोषण करून राहिली होती. तिला बाबांना थोडक्यात केलेला बोध ("'श्रद्धा व सबुरी' हे दोन पैसे देवाला दिले की सर्व त्यात आले") हा पटविला म्हाळसापतींनीच तिची गोष्ट सांगून !

बाबा दसऱ्याच्या शुभ मुहुर्तावर निजधामास गेले त्यावेळी सर्व भक्तगण दुःखसागरात बुडाला. म्हाळसापतींनाही शोक अनावर झाला. मागीलप्रमाणे योगसामर्थ्याने बाबांनी ७२ तास समाधी घेतली तशीच यावेळी घेतली असेल असे त्यांच्या भोळ्या भावुक मनाला वाटत होते परंतु ती आशा फोल ठरली. म्हाळसापती मूक अश्रु ढाळीत होते. आपले सुखनिधान यापुढे आपणास प्रत्यक्ष दिसणार नाही परंतु बाबा आपल्यापासून दूर नाहीत, याची त्यांच्या सतत सहवासात राहिल्याने त्यांची खात्री होती. बाबा देहाने गेले तरी त्यांच्या हातच्या वस्तूंच्या रुपाने ते अमर आहेत. त्यांचा नित्य वास या शिरडीत आहे असे त्यांचेच मन त्यांची समजूत करीत होते. हृदयस्थ परमात्मा त्यांना ही जाणीव वेळोवेळी देत होता. मनातल्या मनात बाबांचे बोलणे, निर्मळ प्रसन्न हसणे, त्यांचे लेंडीवर जाणे येणे, चावडी मिरवणुकीचा सोहळा, रोजचा इंडीचा सोहळा, दिवसभराच्या आरत्या, भक्तावरील बाबांचे अनुपम प्रेम, रोगग्रस्त, आपदग्रस्त यांना दिलेला दिलासा, अखंड पेटत राहणारी धुनीमाई, बाबांचे परमकोमल चरणयुगुल, त्यांचे प्राणीमात्रावरील प्रेम या सर्व गोष्टी त्यांना पुन्हा पुन्हा आठवत होत्या. डोळे अश्रूनी डबडबले होते पण त्यांनी मन आवरले. सिद्धकोटीला पोचलेल्या त्या भक्ताला रडणे, उसासे शोभले नसते.

श्रीबाबा गेले परंतु त्यांनी आपल्या या लाडक्या भक्ताला आपला आवडता सटका, कफनी चांदीचे रुपये या वस्तु कायम बाळगण्यास दिल्या. याचाच अर्थ या रुपाने मी तुमच्याजवळ आहे आणि तुम्हाला पिढयान्‌पिढया काही कमी पडणार नाही. वयाने मोठे असलेल्या म्हाळसापतींवर बाबांनी मातेसारखे प्रेम केले, अंतरीचे गुह्य त्यांनाच सांगितले. आपला अखंड सहवास त्यांना दिला. आपल्या वस्तु त्यांचे जवळ नित्य ठेवण्यासाठी दिल्या याहून आणखी भाग्य ते कोणते? आणि बाबांचा देह जतन करून म्हाळसापतींनी आपणाला साईसारखे रत्न दिले याहून आपले तरी आणखी भाग्य कोणते?

धन्य ते म्हाळसापतींसारखे भक्त<br>
आणि धन्य त्यांना ओळखणारा दत्तावतारी साई ॥

## संस्थान व्यतिरिक्त गादी-उशी चादरींचे दर

शिरडी येथे बाहेरगावाहून येऊन रहाणाऱ्या भक्तांना संस्थानतर्फे गादया, उशा व चादरी पुरविल्या जातात. परंतु अलीकडच्या काळात येथे होणाऱ्या तुफान गर्दीमुळे संस्थानच्या गादया, उशा, चादरी सहाजिकच अपुऱ्या पडतात. काही स्थानिक मंडळी स्वतःच्याकडील गादया, उशा, चादरी भक्तांच्या उपयोगासाठी भाड्याने देण्याचा धंदा करतात असे दिसून आले असून त्याकरिता ते मन मानेल तसे भाडे आकारतात. संस्थानने याबाबतीत जातीने लक्ष घालून या प्रवृत्तीस आळा बसावा म्हणून असा धंदा करणाऱ्या सर्व लोकांना परवाना देऊन त्यांचे योग्य ते भाड्याचे दर ठरवून दिलेले आहेत. हे दर पुढीलप्रमाणेः—

| | |
|---|---|
| १) गादी, उशीसह | ००–७५ पैसे दर दिवशी |
| २) चादर | ००–५० पैसे ,, |
| ३) उशी फक्त | ००–१५ पैसे ,, |

भक्तांनी या दरांची नोंद घेऊन ठरवलेल्या दरापेक्षा अधिक दर मुळीच देऊ नयेत व या दरापेक्षा अधिक दर द्यावा असे जर कुणी भाग पाडीत असेल तर ताबडतोब संस्थानच्या मुख्य कार्यालयात कळवावे अशी विनंती आहे.

# श्रीसाईबाबांच्या छायाचित्रांचे व साहित्याचे

# सुंदर प्रदर्शन

श्रीसाईबाबांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त शिरडीत एक भव्य प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात श्रीसाईबाबांच्या भारतातील ठिकठिकाणच्या मंदिरातील मूर्तींची छायाचित्रे व श्रीसाईबाबाविषयक विविध भाषेतील प्रसिद्ध साहित्याच्या प्रती भक्तांना बघण्यासाठी म्हणून ठेवलेल्या होत्या. हे प्रदर्शन गुरुवार दि. ९-११-७८ ते सोमवार ता. १३-११-७८ पर्यंत प्रेक्षकांसाठी खुले ठेवण्यात आले होते. सुमारे ४० वर सुंदर छायाचित्रे व बाबांची इतर छायाचित्रे तसेच प्रकाशित साहित्य ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन अखिल भारतीय श्रीसाई समाजाचे अध्यक्ष महामना श्रीराधाकृष्णस्वामीजी, बंगलोर यांचे शुभहस्ते गुरुवार दि. ९-११-७८ रोजी सकाळी १० वा. झाले. याप्रसंगी कोर्टरिसिव्हर श्री. क. ही. काकरेसाहेब, साईलीला मराठी आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर श्रीबाबांच्या मंदिराचे व्यवस्थापक श्री. विठ्ठलराव बागवे, निवासस्थाने प्रमुख श्री. अवधूतराव शिंदे, रिझर्व्ह बँकेच्या वरळी शाखेचे प्रमुख अधिकारी श्री. गोपाळराव इनामदार, शिरडी येथील कार्यालय प्रमुख श्री. मोदी इ. मंडळी हजर होती. हजारो साईभक्तांनी हे प्रदर्शन पाहून समाधान व्यक्त केले. भारतातील दूरदूरच्या साई मंदिरातील मूर्तींचे दर्शन एकत्र लाभल्याने सर्वच भक्तांना आनंद वाटला. शिरडी संस्थानचे एक सेवक श्री. वसंतराव कुळकर्णी ह्यांचे चिरंजीव श्री. विलास ह्यांनी ह्या प्रदर्शनासाठी विशेष परिश्रम घेतले व प्रदर्शनाच्या दिवसात प्रदर्शनाच्या ठिकाणी बराच वेळ उपस्थित राहून प्रदर्शन यशस्वी करण्यास सर्वतोपरी मदत केली म्हणूनच ह्या प्रदर्शनाला एवढे यश मिळाले.

या प्रदर्शनात पुढील साई मंदिरातील संचालकांनी भाग घेऊन चित्रे प्रदर्शनासाठी पाठविली. त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. या सर्व मंडळींना व्यक्तिगत आभार प्रदर्शनाची पत्रे माननीय रिसिव्हरसाहेब यांनी वेळीच पाठविली आहेत. ज्या कुणास अशा प्रकारचे प्रदर्शन नजिकच्या काळात आपल्या स्थानी भरवावयाचे असेल त्यांनी कार्यकारी संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा म्हणजे रितसर त्यांचेशी संपर्क साधता येईल.

प्रदर्शनात सहभागी झालेले साईमंदिर संचालक :—

१) कै. भाऊसाहेब लोंबर, श्रीसाईनाथ कृपामठ, स्वारगेट, पुणे ९
२) श्री. भाईसाहेब मालपेकर, साईधाम, व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई ४
३) श्रीसाईबाबा आरती सत्संग, सेक्टर ५, भिलाई नगर, (मध्य प्रदेश)
४) श्री. देशकर बंधू, श्रीसाईदरबार, गाडीखाना, नागपूर–२
५) श्री. दौलतराम आसरानी, श्रीसाईबाबा मंदिर, आनंद सिनेमा, ठाणे
६) श्रीसाईबाबा मंदिर, भाऊकाळे गल्ली रावपुरा, बडोदा
७) श्रीबद्रीनारायण शर्मा, श्रीसाईमंदिर, इसामिया बाजार, हैद्राबाद, (आंध्र प्रदेश)
८) श्रीमती लीलाताई गोलतकर, अभंग बिल्डिंग, परळ व्हिलेज
९) श्री. जी. एल. नागदा, श्रीसाईबाबा मंदिर, फुलेरोड, डोंबिवली
१०) श्री. म. बा. साळवी, केशवकुंज, फणसोप, जि. रत्नागिरी
११) श्रीसाईदास मंडळ, ८३/८४ रासने चाळ, शिवाजी नगर, पुणे ५
१२) श्रीसाईबाबा बस्ती कैलास बाकीवाला, चेतक मार्ग, जयपूर (राजस्तान)
१३) श्री. हनुमंत केशव सावंत, ॲसबेस्टॉस सिमेंट कंपनी, मु. पो. मुलुंड, मुं.–८०
१४) श्रीमती सावंत, श्रीसाईबाबा मंदिर, बाळाराम पाटील मार्ग, खारीगाव, भाईंदर
१५) श्रीसाईबाबा मंदिर, मु. पो. सालूर (आंध्र प्रदेश)
१६) श्रीनारायण स्वामी भगवती, श्रीसाईसंस्थान, कुर्ला, पनवेल, दिल्ली
१७) श्री. वामनराव पाटील, श्रीसाईबाबा मंदिर, नरपड, डहाणू
१८) श्री. मोहितेबाबा, श्रीसाईमंदिर, जांबोरी मैदान, वरळी, मुंबई
१९) श्रीसाईसेवा मंडळ, मु. पो. वर्धा, (नागपूर)
२०) श्रीराधाकृष्णस्वामीजी, श्रीसाईमंदिर, त्यागराजनगर बंगलोर
२१) श्री. आर. एस. चिटणीस, लोदीरोड, नवी दिल्ली
२२) श्री. दिनकरराव सपकाळ, श्रीसाईबाबा सेवासमिती, लष्कर, ग्वाल्हेर
२३) श्रीसाईबाबा मंदिर, पिकेट, सिकंदराबाद
२४) श्रीलिमये बाबा, श्रीसाई अध्यात्मिक केंद्र, यशोधन, सितलादेवी टेंपल रोड, माहिम, मुं. १६
२५) श्री. भोलानाथ समेळ, शालवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगाव ४
२६) श्री. ठाकोरभाई पानवाला, श्रीसाई सत्संग मंडळ, नानीहिंगपोळ चौटा बाजार, सुरत
२७) श्री. गिरीश चंपकलाल टन्ना, योगी इंडस्ट्रियल कारपोरेशन वंथाली गेट, जुनागड

२८) श्री. शारदाकला मंदिर, लकडीपुल, मु. पो. नागपूर

२९) श्री. पी. एल. गोयल, श्रीसाईबाबा मंदिर, गरखल, पो. कसौली, हिमाचल प्रदेश

३०) श्रीसाईबाबा मंदिर, अहमदाबाद

३१) श्री. डी. के. जाधव मास्तर, चालक श्री महिला कला मंदिर, ३६१ व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई ४

# ती कळी फुललीच नाही !

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

—कु. विद्या सदानंद परकर
चिंचपोकळी, मुंबई १२

( कुमार उल्हास सकपाळ याला दि. ३०–८–७८ रोजी देवाज्ञा झाली त्याला एका अज्ञात भगिनीने वाहिलेली ही श्रद्धांजली )

* सुष्ट–दुष्ट जगाच्या उद्यानात फुललेले, उल्हासाच्या दवबिंदूनी डवरलेले, उत्साहाच्या वायुलहरींवर लहरणारे ते कोमल फूल अकालीच कोमेजले ! देवाच्या चरणांवर भक्तीभावाने वाहिलेले पुष्प-सायंकाळपर्यंत, रात्रीपर्यंत तरी टवटवीत राहते. परंतु उल्हास-वासुदेव सकपाळ नावाच्या एका तरुणाच्या जीवनपुष्पाचे मध्यान्ही-पूर्वीच निर्माल्य झाले !

हा माझा एक भाऊ, उल्हास सकपाळ. ऐन पंचवीशीच्या उंबरठ्यावर असणारा पंचक्रोशीत साऱ्यांना हवा हवासा वाटणारा, उमद्या व्यक्तिमत्त्वाचा, गोड स्वभावाचा, निर्मल चारित्र्याचा हा साईभक्त ३० ऑगस्ट १९७८ या दिवशी, दिस अस्ताला जात असताना अस्तंगत झाला, साईचरणी विलीन झाला !

एवढयाशा छोटयाशा आयुष्यात निरलस सेवाभावाने साऱ्या आप्तांची कुटुंबियांची मने जिंकणारा उल्हास नावाप्रमाणेच उल्हसित होता, उमलत्या गुलाब पुष्पासारखा !

बरोबरीची मित्रमंडळी सिने संगीताची धून छेडीत, शीळ घालीत, त्यावेळी हा साई बाळ साईनाथाच्या भजनाची एखादी ओळ, एखादा अभंग गुणगुणत असायचा. कुणाला कुणाचे, कुणाला कशाचे, तर याला वेड साईनाथाचे, साईभक्तीचे !

## संपादकीय –

स. न. वि. वि.

### श्रीसाई काव्यबहार अंक

श्रीसाईलीला मासिकाकडे जे साहित्य येते त्यामध्ये गद्य मजकूरापेक्षा पद्य मजकूराचीच आवक अधिक असते. असंख्य साईभक्त बाबांना काव्यपंक्तींद्वारे स्तुती-सुमने वाहतात. गेल्या ५७ वर्षांत या मासिकाने बाबांच्यावर भक्तांनी रचलेल्या अशा असंख्य कविता प्रसिद्ध केल्या आहेत. तसेच या मासिकाने श्रद्धाभावयुक्त कविता करणारे अनेक कवीपण निर्माण केले आहेत.

गेल्या तीन वर्षांपासून बाबांच्यावर रचलेल्या कवितांचाच एक अंक प्रसिद्ध करण्याचे आम्ही ठरविले; व आमचा हा उपक्रम असंख्य साईभक्तांना व कवींना स्तुत्य वाटला व त्यांनी आमच्या कल्पनेचे स्वागतच केले. हा अंक श्रीसाईलीला लेखक-कवी स्नेहसंमेलन प्रसंगी अध्यक्षांचे शुभहस्ते प्रकाशित होत आहे याबद्दल अतिशय आनंद होत आहे. या अंकात सामान्य भक्तापासून तो थोरामोठ्या प्रसिद्ध कवींनी रचलेल्या साईभक्तीपर कविता एकत्रित केल्या आहेत. वाचकांना या श्रीसाईकाव्य सुमन गुच्छाचे आकर्षण वाटून नेहमीप्रमाणेच हा अंक त्यांना संग्राह्य वाटेल यात शंका नाही. ★

### श्री. नानासाहेब रासने यांचा सत्कार

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे माजी विश्वस्त श्री. दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने यांचा ८० वा वाढदिवस पंढरपूर येथे कासार युवक मंडळातर्फे भांडे गल्लीत दिनांक ९-१२-७८ रोजी साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री. मुकुंद रंगनाथ होरणे हे होते. त्यांच्या शुभहस्ते श्री. नाना-साहेबांना शाल व श्रीफळ अर्पण करण्यात आले. तसेच अनेकांची नाना-साहेबांच्याबद्दल गुणगौरवपर भाषणे झाली.